जलसंवाद
पुणे. वर्ष दुसरे. सेप्टेंबर, २०२२. अंक ९ वा.
पृष्ठसंख्या : ३२. वार्षिक वर्गणी : रुपये १०० फक्त

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक
संपादक: डॉ. दत्ता देशकर, श्री.सतीश खाडे




**आणि.. ..आणि पाण्याच्या डोळ्यातूनही दोन थेंब ओघळले**
**कारण एक जलमित्र काळाच्या पडद्याआड गेला.**
**श्री. शरद मांडे स्मृती विशेषांक**



श्री. नितीन गडकरी यांची खडकवासला धरणाला भेट



डॉ. मोरवंचीकर यांच्या कुटूंबियांच्या समवेत







विविध संस्थांतर्फे झालेले सत्कार

# जलसंवाद

भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

ऑक्टोबर २०२२



■ संस्थापक संपादक
डॉ. दत्ता देशकर
कै. प्रदीप चिटगोपेकर

■ वर्तमान संपादक
डॉ. दत्ता देशकर - ०९३२५२०३१०९
श्री. सतीश खाडे - ०९८२३०३०२१८

■ मुखपृष्ठ व सजावट
अजय देशकर

■ अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
आरती कुलकर्णी

■ मुद्रण -
श्री. जे प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०



■ वार्षिक वर्गणी : ५०० /-
पंचवार्षिक वर्गणी : रू. २०००/-
दशवार्षिक वर्गणी : रू. ३५००
(या मासिकाची वर्गणी dgdwater@okaxis या लिंकवर ऑनलाईन भरू शकता)



■ जाहिरातींचे दर : मलपृष्ठ क्र. ४ रू. १५०००. वेष्टण पृष्ठ २ व ३ रू. १०,०००. आतील साधे पान रू. ५०००.
(वर्षाचे पॅनल बुक केले तर २० टक्के सूट मिळेल)



या अंकाचे मूल्य : रू. ५०/-


## अनुक्रमणिका


- संपादकीय / ४
- गुरूची भक्ताला श्रध्दांजली
  श्री. रा. श्री. मोरवंचीकर / ५
- कै. शरद मांडे - पारदर्शी व्यक्तिमत्व
  डॉ. दि. मा. मोरे / ९
- श्री. शरद मांडे - एक आगळं वेगळं व्यक्तिमत्व
  श्री. विद्यानंद रानडे / ११
- हेलो....मी मांडे बोलतोय - श्री. कमलकांत वडेलकर / १३
- श्री. शरद मांडे यांना श्रध्दांजली
  श्री. हरीष बुटले / १५
- अखंड कार्यरत असलेले कै. शरद मांडे
  श्री. अरूणचंद्र पाठक / १७
- नॉलेज पार्टनर - डॉ. मंगेश कश्यप / १८
- भरभरून व्यक्त होणारा जल-अभ्यासक - शरद मांडे
  श्री. प्रदीप पुरंदरे / १९
- पाण्याच्या विश्वात रममाण होणारे शरद मांडे
  डॉ. सुरेश कुलकर्णी / २०
- जलदुवा निखळला - डॉ. प्रवीण महाजन /२१
- श्री. शरद मांडे यांना आदरांजली
  श्री. सुरेश खानापूरकर / २२
- माझे सहकारी श्री. शरद मांडे
  श्री. अशोक अळवणी / २३
- आदरणीय मांडे साहेब जीवन प्रवास....
  श्री. नितीन कांतीलाल मेहता / २४
- श्री. शरद मांडे - निर्मलतेचा शाश्वत झरा
  श्री. गजानन देशपांडे / २६
- ध्येयवेडा... कर्मयोगी... स्वर्गीय शरद मांडे
  श्री. प्रफुल्ल कुलकर्णी/ २७
- शरद मांडे - एक वेगळे व्यक्तिमत्व - श्री. अरूण मांडे / २८
- Eulogy - To Aaba - Sharad Mande
  Soham Deshpande / ३०
- आमचे उत्साही बाबा - श्रीमती. गीतांजली शेवडे / ३१



जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ पुणे - ४११०३० येथे ऐ - २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे - ४११०४५ येथे प्रसिध्द केले.

संपादक डॉ. दत्ता देशकर
e-mail - dgdwater@gmail.com
मासिकाची वेबसाईट - www.jalsamvad.com

# संपादकीय ...........

कधीकधी मी जेव्हा विचार करतो तेव्हा मनामध्ये दीर्घायुष्य हे शाप की वरदान हा प्रश्न मनाला विचारावासा वाटतो. एका बाजूला निसर्गाशी लढत आपण इतके दिवस आनंदाने जगलो याचे समाधान वाटत राहते पण जेव्हा आपल्या बरोबरचे आपले सहकारी, सखेसोयरे एका मागोमाग जेव्हा काळाच्या पडद्याआड जातात तेव्हा हे बघण्यासाठी आपण जीवंत का आहोत  हा प्रश्न मनाला निश्चितच पडतो. आपले शाळकरी मित्र. आपल्या बरोबर शिकलेले महाविद्यालयीन मिंत्रमंडळ, नोकरी व्यवसायात आपल्या बरोबर हिरिरीने काम करणारे सहचारी, आपल्या कुटूंबातील आपले सखेसोयरे जेव्हा अंतराळात विलीन होतात तेव्हा जड अंतःकरणाने आता त्यांची पुन्हा भेट होणार नाही याची खंत मात्र शिल्लक उरते.

हाच अनुभव आपल्या सर्वांचे लाडके श्री. शरद मांडे जेव्हा आपल्याला अवेळी सोडून गेले तेव्हा पुन्हा एकदा  प्रत्ययास आला. आपणा सर्वांशी खेळीमेळीने वागणारे, बोलणारे मांडे आता आपल्यामध्ये  नाहीत याचे अतीव दुःख मनाला सतत बोचत राहणार आहे. महिन्यात किमान एकदा होणारी प्रत्यक्ष भेट, फोनवर त्यांचेशी दीर्घकाळ बोलत राहणे याला आता आपण मुकणार याची जाणीव असह्य होते. आपल्या जलसंवाद कुटूंबाचे ते एक सन्मान्य सभासद होते. या कामासाठी त्यांचे कडून  सतत होत राहणारे कौतुक, सुधारणेसाठी होत असलेल्या सकारात्मक सूचना, त्यांचेमागे लागून जलसंवादसाठी मिळवलेले लेख, अंकातील त्रुटींबद्दल न बोचणारी सुसह्य पण बोधप्रद टीका या सगळ्याना आता मुकणार याची जाणीव होताच मन विषण्ण होते.

एका गोष्टाचे श्रेय मात्र मी निश्चितच घेणार आहे. ते म्हणजे मांडेसाहेबांना लिहिते करण्याचे. जलसंवादसाठी मी जे अनेक लेखक निर्माण केले त्यात मांडेसाहेब एक होते. त्यांना लिहिण्याचा अत्यंत कंटाळा. मी त्यांना नेहेमी म्हणत असे, शरदराव तुमच्या संग्रही  अनेक विचार आहेत पण ते तुम्ही लिखित शब्दात कधीच व्यक्त करत नाहीत, या उलट आमचेसारखे लोक, ज्यांच्या जवळ विचार नाहीत पण लिहिण्याची खुमखुमी मात्र जास्त. तुमच्या विचारांचा संग्रह आमच्या वाचकांसाठी खुला करा की. हो नाही करता करता त्यांनी मासिकासाठी बरेच लिखाण केले. विशेषतः जलसंवाद मासिकाच्या इंग्रजी अंकासाठी. त्यांनी आणि मी पुण्यनगरी दैनिकासाठी पाण्यावर महिन्यातून दोन लेख लिहायला एकदमच सुरवात केली.  लेख छापून आल्याबरोबर ते त्याची प्रत अगत्याने मला पाठवीत असत. त्या प्रत्येक लेखावर नंतर सविस्तर चर्चा पण होत असे. काही दिवसांपूर्वी त्यांचे जीवनात ज्या संस्था आल्यात त्यांचा परिचय करुन देणारी एक लेखमाला लिहिण्याचे त्यांनी कबूल केले होते. पण आता ते शक्य नाही या बद्दल निश्चितच वाईट वाटते.

एकदा मनात विचार आला, महाराष्ट्राचा जलमागोवा नावाचा ग्रंथ लिहिण्याचा.  हे काम एकट्या दुकट्याने होण्यासारखे नव्हतेच.  आमचे परम मित्र धुळ्याचे श्री. मुकुंदराव धाराशिवकर, नागपूरचे श्री. प्रवीण महाजन आणि श्री. शरद मांडे यांचेशी भरपूर चर्चा झाली. ग्रंथाचे स्वरुप निश्चित झाले, भरपूर बैठका झाल्या पण हा प्रकल्प पूर्ण होण्याचा योग नव्हता. फार मोठ्या प्रकल्पाला हात घालण्याचा प्रयत्न मी करुन पाहिला पण यश मात्र आले नाही याची चुटपुट मात्र शिल्लक राहिली. या प्रकल्पाचे दोन महत्वाचे आधारस्तंभच आता कोलमडून पडले आहेत.

मरावे तरी कीर्तीरुपे उरावे अशी मराठी भाषेत एक उक्ती आहे. जुन्नर येथे मांडेसाहेबांना श्रद्धांजली अर्पण करणारी शोकसभा आयोजित केली गेली. या शोकसभेला उपस्थित राहण्याचा योग मला आला. ज्या शाळेत आपण शिकलो, ज्या शाळेने भरभरुन आपल्याला दिले त्या शाळेचे आपण काही देणे लागतो, त्या शाळेसाठी आपण काही तरी केले पाहिजे ही जिद्द मला तिथे दिसून आली. औरंगाबादचे डॉ. मोरवंचीकर, डॉ. माधवराव चितळे आणि जुन्नरची शाळा ही त्यांची तीन श्रद्धास्थाने होती. तिघांचाही प्रत्येक भेटीत एकदा तरी उल्लेख होतच असे. या शाळेला जरी मी प्रथमच गेलो होतो  तरी मला त्या शाळेचा परिचय आधीच झाल्यासारखे वाटत होते. माझी आधी कधीच भेट झाली नसतांना सुद्धा बरेच जण मला व माझ्या मासिकाला तिथे ओळखत होते. त्यांचेशी  बोलतांना ते अगत्य मला दिसत होते. शोकसभेत प्रत्येक वक्ता मांडेसाहेबांच्या  कार्याचा भरभरुन उल्लेख करीत होता. ते गेले तरी त्यांचे कर्तुत्व या शाळेच्या माध्यमातून आपल्या कायमचे स्मरणात राहणार आहे.

त्यांचा उत्साह तर खूपच दांडगा होता. कार्यशाळा घेणे हा तर त्यांचा आवडता छंद होता. आपल्या कामात कोणतेही वैगुण्य राहू नये याची ते सतत काळजी घेत असत. कार्यशाळेसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी ते कधीही मागेपुढे पाहात नसत. प्रत्येक कार्य शाळा म्हणजे ३० ते ४० हजारांची टोपी हे जणू काय एक सूत्रच तयार झाले होते. पण त्याचा त्यांना न खेद न खंत. मी माझ्या वयाची ८१ वर्ष पूर्ण केलीत तेव्हा माझेपेक्षा त्यांनाच जास्त आनंद झालेला दिसला. त्यांनी व माझे मित्र श्री. अनिल पाटील यांनी त्यासाठी आयोजित केलेला मोठा सोहोळा तर मी कधीच विसरणार नाही.

असे आपल्या सर्वांचे मित्र आपल्याला सोडून गेलेत याची चुटपुट मात्र मनाला सदैव बेचैन  करत राहणार आहे. त्यांचेशिवाय जगायची सवय आता आपल्याला करुन घ्यायची आहे. त्यांना आपल्या सर्वांतर्फे सविनय श्रद्धांजली अर्पण करुन येथेच थांबतो.

**डॉ. दत्ता देशकर**
**संपादक**

# गुरूची भक्ताला श्रध्दांजली

**डॉ. रा.श्री. मोरवंचीकर**

**मो : ०२४०-२३५३२७५**



मांडेंचा आणि माझा साधारण दोन दशकांचा संबंध. पण ज्या क्षणी आम्ही एकमेकांना पहिल्यांदा भेटलो त्याच क्षणी त्यांनी मला तुम्ही माझे गुरू आहात असे म्हणून तिथे पाय धरले. मला ते शिष्य आहेत म्हणून नव्हे तर एका प्रामाणिक माणसाने मला गुरू करावं याचं मला इतकं अप्रूप वाटलं की आपली ओळख जाणणारी माणसं ही ज्ञानेश्वराने लिहिलेलं आहे, हे कसं ओळखावं जाणतेने गुरू वरची जेणे कृतकार्य होई जे जैसे मूळ सिंचने शाखा पल्लव संतोषी. म्हणजे त्यानं जाणलं की हे हेच आपले गुरू आपल्याला दिलेले आहेत. आणि नंतर त्याने विचार करण्याची दिशाच बदलली. मुळचा अभियंता, स्वत:ची कंसल्टंसी सगळे काही व्यवस्थित असूनही सुरू आहे त्याला मी नवी जल संस्कृतीची दिशा दिली आणि त्या जलसंस्कृतीच्या वाटचालीमध्ये त्याने आजपर्यंत जे काही उपलब्ध किंवा प्राप्त करून घेतलं ते अतिशय महत्वाचं आहे. बुऱ्हाणपूर ला या वयात ते १० वेळा गेले, आणि प्रत्येक वेळेस त्याला  काय काय सापडलं याचं मला सविस्तर वर्णन केलं. मी म्हणलं हे मला सांगून उपयोग नाही, हे जगाला सांगा, म्हणून त्याने जगाला सांगण्यासाठी बुऱ्हाणपूर वर पुस्तक लिहिलं, मी प्रस्तावना लिहिली. मी देत नव्हतो, प्रसिध्दी पराङ्मुख ज्या प्रारब्धात गोष्टी आहेत त्या होतच असतात. म्हणून मी त्याची प्रसिध्दी जेव्हा होइल तेव्हा होईल पण त्याने हट्टच धरल्यामुळे वॉटर वंडर वगैरे असं काही तरी बुऱ्हाणपूर हे हायड्रॉलिक वॉटर वंडर मी त्यांना प्रस्तावना दिली. २५ -३० पानांची काहीतरी प्रस्तावना आहे आणि तेच नाव त्याने त्या पुस्तकाला दिलं. त्या पुस्तकाचा आजही जगभर प्रसार आहे नुसताच प्रसार नव्हे तर त्याचा उदो उदो आहे. म्हणून शिष्य व्हावा ऐसा याचा तिन्ही लोकी झेंडा, त्याची पैस, त्याची झेप आज ते जिथे जिथे जातात तिथे तिथे त्याला त्या पुस्तकाने आनंद होतो. जीवनात हे त्यांचे पहिले पुस्तक, दुसरं पुस्तक मी त्याला म्हंटलं की तुम्ही पुण्यावर लिहा, पुण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर लिहा, सुरूवात केली होती आणि मधेच हा अपघात झाला. खरं तर त्यांची माझ्या संशोधनामध्ये इतकी मदत झाली ॲकॅडमीक हेल्प ज्याला म्हणतात, प्लॅटॅनिक लव्ह ज्याला म्हणतात ती मदत मी विसरू शकत नाही. मला संशोधनामध्ये मी २५ वर्ष ज्ञानदेवांच्या पलिकडे क्षेत्र निवडलेलं नाही. जसं मी जल संस्कृतीमधून मुक्त झालो किंवा मला मुक्त केलं गेलं त्या क्षणापासून मी ज्ञानेश्वराला वाहिलं की तू तरी मुक्त करणार नाहीस मला, तसा प्रकार आणि माझी आत्मप्रौढी नव्हे माझी जी पुस्तकं ज्ञानेश्वरावर लिहीली गेली त्याला जी जागतिक लोकप्रियता मिळाली त्या प्रत्येक प्रस्तावनेमध्ये मांडे नी मला काय काय दिलं हे त्यात मी लिहिलं आहे. आणि जवळ जवळ माझे ते मानस शिष्य तर होतेच, शिष्यही मोजकेच घ्यावे लागतात, नाहीतर ओळखीचे सगळेच असतात,  मित्र एखादाच असतो, शिष्य १-२ असतात. चलो मच्छिंदर गोरख आया है, एकच गोरख आहे त्याचा, मच्छिंद्राचे अनेक  शिष्य आहेत माझे हजारो शिष्य असतील तो भाग सोडून देवू ते शिष्य नव्हते ते विद्येपुरते माझ्याकडे आले होते, And I am paid for that, मी काही त्याच्यावर काही उपकार केला असं काही नाही. भरपूर पगार मला देत होतं शासन, आणि त्यामुळे असा शिष्य, असा प्रामाणिक माणूस आणि मनाचा अतिशय निरागस , कोणाविषयीही आकस नाही, हा मिळणे हा केवळ दैवयोग असतो म्हणून त्यांच्या बुऱ्हाणपूर बरोबर मी सुध्दा शैक्षणिक किंवा बौध्दिक जग प्रवास करून आलो. या क्षणाला मला इतकंच सांगावेसे वाटतं की चुकून त्यांची ज्ञानेश्वर भक्ती पाहून ज्ञानेश्वरांना मोरवंचीकर म्हणून नेलं असाव ज्ञानेश्वरांनी आणि मला म्हणून मांडे म्हणून ठेवलं असावं इतकं आमचे परस्परांशी घनिष्ट संबंध. रोज रात्री



९.१५ ते ९.४५ त्यांनी सांगितलं की मी जगात कुठेही असलो तरी तुमच्या पायी पडल्याशिवाय, तुमची प्रार्थना केल्याशिवाय, दर्शन घेतल्याशिवाय मी निरोप घेणार नाही, पुढचं पाऊल टाकणार नाही. आणि त्या वचनाशीही ते प्रामाणिक राहिले. या कालात वचन देणं, वचन पाळणं, चांगले क्वालिफाईड माणसं सुध्दा वचनं पाळत नाहीत, त्यामुळे त्यांचे कौतुक किती करणार मी, शब्दाला मर्यादा आहेत, काही भावना शब्दात व्यक्त करता येत नसतात. याक्षणी मला जेवढ्या काही करता आल्या त्या मी करतो. ते कोण प्रकाशित करणार आहेत वगैरे नव्हे, पण माझ्या मनात त्याने जे घरे केलेलं आहे ते मी जेव्हा संपेल तेव्हाच ते घर अपोआप येईल माझ्याबरोबर प्रवासाला. आता मला जास्त बोसता येत नसल्यामुळे इथेच थांबतो

*****




जुन्नर येथे शोकसभेप्रसंगी



श्री. नितीन गडकरी यांची खडकवासला धरणाला भेट

# कै.शरद मांडे - पारदर्शी व्यक्तिमत्त्व

डॉ.दि.मा.मोरे

मो : ९४२२७७६६७०



पुण्याच्या कोथरूड परिसरातील मयूर कॉलनीतील अत्यंत कलात्मक रितीने बांधलेल्या त्यांच्या बंगलारूपी निवासात जाण्याचा मला अनेकवेळा योग आला. त्यांच्या निवासाकडे पाहिल्यानंतर खरंच असे वाटते की, ते अभियंत्याचे घर आहे. घराकडे पाहिल्यानंतर आणि विशेषतः दिवाणखान्यात पाहुणचार घेताना कै.मांडे या व्यक्तीच्या राहणीमानातील चव नकळतपणे लक्षात येते. दोघे पती-पत्नी अतिशय नम्रपणे तुमचे सान्निध्य जपण्याचा प्रयत्न करत असल्याचा अनुभव अनेकांना आलेला असेल.

कर्नाटकातील बिदर या जिल्ह्याच्या ठिकाणी कर्नाटक पर्यटन विभागाने आयोजित केलेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेला ते जाऊन आले होते. परिषदेचा विषय 'करेज' (भूमिगत कालवा) असा होता. इतिहासकाळात जगातील अनेक देशांमध्ये करेज या पारंपारिक साधनाद्वारे नागरी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याचे सांगाडे ठिकठिकाणी पाहवयास मिळतात. इराण, इराक, इजिप्त या देशामध्ये या भूमिगत कालव्यांना 'कनाथ' (Quanat) या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्रात 'नहर' या नावाने हे कालवे ओळखले जातात. पाणीवापराच्या वेगवेगळ्या पारंपारिक साधनांचा भारताला फार मोठा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे भारत हा तलावाचा, बारवांचा, आडांचा, नहरींचा, मंदिराचा, किल्ल्यांचा देश म्हणून ओळखला जातो. विजापूर, मिरज, सांगली, भोर, औंध, पुणे, जुन्नर, तिसगाव, औरंगाबाद, जालना, शिंदखेडराजा, अचलपूर, चंद्रपूर, तंजावर, बुऱ्हाणपूर ही काही नहरीचे अस्तित्व दाखविणारी ठिकाणे आहेत. अशाच नहरी बंगलूरू, बिदर याठिकाणी पण असल्याबद्दल कळाले आणि कै.मांडे यांच्यामुळे माझ्या माहितीत भर पडली. त्या डोळ्याखालून घालण्याबद्दल मनामध्ये विचार येऊन गेला. तसे मी बोलल्याचे पण आठवते. बिदर हा माझ्या (लातूर) शेजारचा जिल्हा आहे. तो लाल मातीने (लॅटेराईज) व्यापलेला आहे. बहामनी राजवटीच्या कालखंडात बिदर हे ठिकाण बरीदशाही राजवटीचे राजधानीचे ठिकाण होते. बिदरला मोठा भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला लाल दगडांना तासून निर्माण केल्यासारखा वाटतो. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे, या किल्ल्याला लाल खडकात तासलेला तीन पदरी (ट्रीपल) खंदक आहे. साधारणतः भुईकोट किल्ल्याला खंदक असतात आणि ते एकेरी किंवा दुहेरी असतात. बिदरच्या किल्ल्याचे वेगळेपण तीन पदरी खंदकामुळे आठवणीत राहते. इतिहासकालीन जलव्यवस्थापन हा माझ्या आवडीचा विषय राहिलेला आहे. बिदर या शहराच्या आसपास बारमाही वाहणारे झरे आहेत. नानकझीरा हा त्या ठिकाणचा प्रसिद्ध झरा आहे. त्या शहराच्या परिसरातच नहरी असल्याची मला माहिती नव्हती. मांडे यांच्याकडून ही माहिती मिळाल्यामुळे मला आनंदच झाला.

औरंगाबाद स्थित इतिहासाचे गाढे अभ्यासक व पारंपारिक जलव्यवस्थापनाकडे अतीव आदराने पाहणारे आणि स्वतःच्या चिंतनातून जलविकासाला एक वेगळा आयाम देणारे डॉ.रा.श्री.मोरवंचीकर यांच्या सान्निध्यामुळे बुऱ्हाणपूर येथील पाण्याच्या जुन्या खजिन्याकडे मांडे आकर्षित झाले. मध्यप्रदेशातील तापी नदीच्या उजव्या तीरावर वसलेल्या बुऱ्हाणपूर या ऐतिहासिक राजधानीच्या पारंपारिक जलव्यवस्थापनातील वैभवाचा मांडे यांनी डॉ.मोरवंचीकर सरांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला. प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित सातपुडा पर्वताच्या पायथ्यापासून उगम पावणाऱ्या नहरींचे आराखडे व त्या पाठीमागील शहाणपण (wisdom) इंग्रजी भाषेतील ग्रंथरूपाने वाचकांच्या समोर आणण्याचे फार महत्त्वाचे काम त्यांनी केलेले आहे. त्या ग्रंथाचे नाव "Burhanpur -A city of hydraulic wonders' असे आहे. या पुस्तकात सात प्रकरणे आहेत, त्यापैकी तीन प्रकरणांचे लेखन मांडे यांनी केलेले आहे. वर उल्लेख केलेल्या बिदरच्या परिषदेत जमलेल्या देशविदेशातील सर्व अभ्यासकांना बुऱ्हाणपूरच्या नहरींची व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी ओळख करून दिल्याचे मांडे यांच्याकडून समजले. या पुस्तकाच्या बऱ्याचशा प्रती त्यांनी परिषदेत भाग घेतलेल्या अभ्याकांना दिल्या आणि पुस्तकात दिलेल्या माहितीवर त्यांच्याकडून प्रतिक्रिया मागविल्या असल्याचे पण मला कळाले होते. अनेकांकडे त्याचा पाठपुरावा पण त्यांनी केला. भारतातील नहररूपी पारंपारिक साधनाला आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचविण्याचे मोलाचे काम त्यांनी केलेले आहे. त्यावेळी नुकतेच ते त्यांच्या वयाची पंच्याहत्तरावी ओलांडत होते. डॉ.मोरवंचीकर सरांबद्दल त्यांच्या मनात अतीव आदर होता. बुऱ्हाणपुरावरील ग्रंथ त्यांनी 'गुरूस्थानी' असलेल्या डॉ.मोरवंचीकर सरांना अर्पण केलेला आहे. त्यांच्या हातून पार पडलेल्या या कार्याबद्दल त्यांना मानसिक समाधानाचा एक ठेवा मिळाला होता. याची जाणीव त्यांच्याबरोबर बोलताना सातत्याने होत राहिली आणि हे स्वाभाविक होते. त्यांच्या या कृतीबद्दल मांडे हे अभिनंदनास पात्र ठरतात. भविष्यात या इंग्रजीतील ग्रंथाचा विस्तार करून त्याला व्यापक स्वरूप देण्याचा विचार ते बोलून दाखवत होते.

फिरणे व प्रवास करणे हा त्यांचा छंद होता. आज मुंबईला, उद्या रेल्वेने दिल्लीत, दोन दिवसांनी पुण्याला परत आणि लागलीच

लोणावळ्याजवळील सहारा सिटी व दुसऱ्या दिवशी संगमनेरच्या पाणीपुरवठ्यावर, अशाप्रकारची त्यांची भ्रमंती पूर्णविराम न देता चालू राहिली. वाहतुकीचे कोणतेही सार्वजनिक वाहन त्यांना वर्ज्य नव्हते. अनेक ठिकाणी शिवनेरीसारख्या वातानूकुलीत गाड्या उपलब्ध नसतात. एस.टी.च्या तांबड्या गाड्यांना जवळ करण्यास ते थोडाही विलंब लावत नसत. रात्री अवेळी पुण्याला स्टँडवर पोहोचल्यानंतर स्टँडवरच एक डुलकी घेण्याचा आनंद ते घेत असत. अडचणीचा फायदा घेऊन अव्वाच्या सव्वा भाडे उकळणाऱ्या रिक्षा चालकांना ते कृतीतून चपराक देत असत. उतार वयात पंच्याहत्तरी ओलांडल्यानंतर सुद्धा विनाथांबा त्यांच्या फिरण्याच्या जीवनशैलीकडे पाहिल्यानंतर इतरांना स्वतःमधील पंगुत्वाची जाणीव होते. दिल्ली या राजधानीच्या ठिकाणी वर्षाकाठी पाणी या विषयावर वेगवेगळे चर्चासत्र, कार्यशाळा, संपन्न होत असतात. नागरी पाणीपुरवठा हा त्यांचा विषय होता. पण त्यांनी या एकाच विषयाच्या चौकटीत स्वतःला बांधून ठेवले नव्हते. विकासाच्या प्रक्रियेत वाहत्या पाण्याचा ज्या ज्या विषयांना (सिंचन, उद्योग, पर्यटन, मनोरंजन इ.) स्पर्श होत असेल त्या सर्व विषयांना आपल्या कवेत घेण्याचा कै.मांडे यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. कधी विमानाने आणि बऱ्याचवेळा रेल्वेने प्रवास करून दिल्लीस्थित महाराष्ट्र मंडळात मुक्काम करून पाण्याविषयीच्या चर्चेत सहभाग नोंदविण्यामध्ये त्यांनी कधीही हात आखडता घेतला नाही. ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये होती. पुण्यामध्ये दुचाकीवर फिरून दिवाळीभेट (अभ्यंगस्नानासाठी उच्चप्रतीचे साबण) देण्याचा नित्यक्रम गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे त्यांनी चालू ठेवलेला होता.

पाण्यावर व इतर सामाजिक विषयांवर होणाऱ्या कोणत्याही स्थानिक वा दूरस्थ स्थानावरील चर्चेस ते उपस्थित राहिले नाहीत असे होणे दुर्मिळच. सिंगापूर जलसंमेलन, भारतीय जलसप्ताह अशा विविध आंतरराष्ट्रीय उपक्रमात ते नियमितपणे सहभागी होत असत. केवळ उपचार म्हणून चर्चेमध्ये सहभागी होणे हे त्यांच्या बुद्धीला पटत नसे. त्याठिकाणी काय घडले, कोणत्या विषयावर चर्चा झाली इ.चा इत्थंभूत वृत्तांत देण्यामध्ये त्यांनी कधीही हात आखडता घेतला नाही. माहितीची देवाणघेवाण करण्यामध्ये त्यांचा उत्साह अलौकिक होता असेच म्हणावे वाटते. शेवटी तुम्हालाच थांबावे लागेल. पण त्यांना कधीही थकवा आल्याचे जाणवत नसे. एखाद्या प्रसंगाचे वर्णन मांडे यांच्याकडून ऐकण्याची मेजवानी घेण्याचा अनुभव अपचन न होऊ देता ग्रहण करण्याची, ऐकणाऱ्यांची तयारी लागत असे. मांडे यांना फुरसतीने दूरध्वनी करण्याचे धाडस अनेकांना करावे लागत असे. त्यांचा दूरध्वनी आला तर पर्याय नसे. बोलण्यामध्ये कंटाळा या शब्दाला त्यांच्याकडे स्थान नव्हते. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन, 'पाणी आणि स्वच्छता' या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थेचे ते दोन तपाच्या आसपास, सचिव आणि काही वर्षे सरचिटणीस म्हणून प्रभावीपणे काम करून आपल्या कार्याचा त्यांनी ठसा उमटवला होता. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन (IWWA) आणि अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन (AWWA) या दोन संस्थांमध्ये दुवा स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन, इंडियाचे ते सन्माननीय सदस्य होते. २०१७-१८ च्या आसपास AWWA चे मुंबईमध्ये दोन दिवसांचे चर्चासत्र पार पडले होते. त्या चर्चासत्रात त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. एका सत्राचे अध्यक्षपद भूषविण्याचा बहुमान पण त्यांना मिळाला असल्याचे मला आठवते. असे प्रसंग त्यांना प्रेरणा देत असत आणि त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढत असे. याचा अनुभव त्यांच्या बोलण्यातून पदोपदी जाणवत असे. जीवनातील आनंदाची परिभाषा करण्याचा मोह त्यांना टाळता येत नसे.

मांडे एका नामवंत मुख्याध्यापकाचे सुपुत्र होते. जुन्नर या ऐतिहासिक शहरात त्यांचा जन्म झाला होता. जुन्नर हे ठिकाण काही काळासाठी यादव राजवटीची राजधानी असल्याचा उल्लेख इतिहासकार करतात. जुन्नरच्या जवळच नाणेघाट आहे आणि या घाटातूनच कल्याणमार्गे समुद्रातून भारतीयांनी विदेशाशी व्यापार करण्याचे नाते जोडले होते. जुन्नरच्या शिवनेरी किल्ल्यातच छत्रपती शिवाजीमहाराजांचा जन्म झालेला आहे. या डोंगरी किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या जुन्नर शहरात आणि परिसरात इतिहासकालीन काही नहरी अद्यापी कार्यरत असल्याचे दिसून येतात. बुऱ्हाणपूरासारखा, जुन्नर या जन्मस्थानाचा 'पाण्याचा इतिहास' कै.मांडे यांचा आवडीचा विषय राहील असे माझ्या मनाने गृहित धरले होते. पाण्याच्या क्षेत्रात श्रद्धेने काम करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाचे चीज करण्याच्या दृष्टीने त्यांना या विषयातील पीएच्.डी. मिळविण्याच्या दृष्टीने मोरवंचीकर सरांबरोबर घडलेल्या संवादाची आठवण करून देत असताना स्वतःच्या शैक्षणिक पात्रतेचाही ते नम्रपणे उल्लेख केला असल्याचे मला आठवते. पुणे येथून शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयातून त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीमधील केवळ डिप्लोमा ही पदवी संपादित केली होती. त्यानंतर लागलीच त्यांनी पुण्यामध्येच पाणीपुरवठा क्षेत्रात क्षेत्रिय स्तरावर काम करण्यास सुरूवात केली होती. काळाच्या ओघात ते शासकीय नोकरीत आले आणि जवळपास दोन तपाचा कार्यकाळ नागरी पाणीपुरवठा या क्षेत्रात काम करून, शासकीय नोकरीचा राजीनामा देऊन, स्वतःच या विषयातले सल्लागार म्हणून काम करण्यास त्यांनी सुरूवात केली होती. नोकरीतून बाहेर पडल्यानंतर त्यांचे अभियंता म्हणून व्यावसायिक जीवन आणि विविध अशासकीय संस्थांचे पदाधिकारी म्हणून सामाजिक जीवन जास्त फुललेले दिसते. यानिमित्त त्यांनी अनेक देशांचा दौरा केला. या क्षेत्रातील अनेक बहुमान त्यांनी मिळविले.

मांडे यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. ते ओळखत नाहीत आणि त्यांना कोणी ओळखत नाहीत अशांची संख्या फार कमी आहे असे म्हणवयास हरकत नाही. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे वैज्ञानिक सल्लागार राहिलेल्या सॅम पित्रोदा या विचारवंताबरोबर ते सहजपणे हसतखेळत बोलत असत. शेतीतज्ञ डॉ.स्वामीनाथन यांच्याशीही त्यांचे जवळचे नाते होते. त्यांच्याकडून आलेली गौरवास्पद पत्रे ते आवर्जून दाखवत असत. डॉ.माधवरावजी चितळे, राजस्थानचे राजेंद्र सिंह, डॉ.विश्वनाथरावजी कराड, शरद जोशी, डॉ.यामिनी, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, स्टॉकहोम वॉटरप्राईज विजेते डॉ.असित बिस्वास, बिंदेश्वर पाठक अशी कितीतरी नावे घेता येतील की ज्यांच्याशी मांडे यांचे स्नेहाचे नाते होते. राजकीय मंडळींच्या पण सहजपणे ते संपर्कात राहात असत. पुणे शहरातील सर्व मान्यवरांना, प्रकाशकांना ते जवळून ओळखत असत. त्यांच्याकडे पुस्तकांचा मोठा संग्रह होता. विशेष म्हणजे ते पुस्तके वाचत असत आणि हातात पेन

घेऊन महत्त्वाच्या ओळींना आधोरेखित करत असत. त्यांच्याशी संवाद करताना या ओळींचा संदर्भ घेण्यास ते विसरत नसत. ज्याठिकाणी ते जात असत त्या ठिकाणी त्यांना आवडलेले पुस्तक विकत घेत असत आणि त्यातील मजकूराबद्दलच्या प्रतिक्रिया लेखकांना आवर्जून कळवत असत. एखाद्या लेखकाने त्यांना पुस्तक भेट म्हणून दिलेले असल्यास त्यावरील प्रतिक्रिया न चुकता लेखकांना कळविण्यात ते अग्रभागी असत. हा सर्व व्याप सांभाळण्यासाठी त्यांना वेळ अपुरा पडत नसे असेच म्हणावे वाटते.

स्वतःच्या पंच्याहत्तरीचा विचार मनात न आणता डॉ.मोरवंचीकर सरांना ८० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्यावर स्नेह करणाऱ्या सर्व व्यक्तींचा मेळावा घेऊन सरांचे अभिष्टचिंतन करावे या विचाराने ते झपाटलेले होते. खडकवासला जलाशयातील गाळ काढण्याच्या मोहिमेमध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. कर्नल (नि.)सुरेश पाटील यांच्या 'ग्रीनथंब' या सैनिकी क्षेत्रातील समविचारी लोकांच्या मदतीने स्थापन केलेल्या संस्थेशी ते विचाराने व कृतीने जोडलेले होते. खडकवासला जलाशय गाळमुक्त व प्रदुषणमुक्त करावा, सभोवतालच्या शेतकऱ्यांचा शिवार गाळयुक्त करावा, गाळाच्या वापरातून जलाशयाभोवती रस्त्याचे रिंगण करावे आणि परिसरवृक्षाच्छादित करून खडकवासला जलाशयाचे रूपांतरण एका पर्यटन स्थळात करावे, या विचाराने ते झपाटून गेलेले होते. खडकवासला जलाशय निर्मितीस १५० वर्षे पूर्ण होत आहेत. १९६१ ला वरच्या भागातील मातीचे पानशेत धरण फुटले व खडकवासला पण फुटले. सर्व माती खडकवासला धरणाच्या भिंतीमुळे जलाशयात साठली. पाणलोटातील जमीनीच्या दरवर्षी होणाऱ्या झिजेने त्यात मोठी भर पडली. जलाशयाची पाणीधारण क्षमता अर्ध्यापर्यंत घटलेली असणार. जलाशयातील गाळ काढणे ही काळाची गरज झालेली आहे. यामुळे जलाशयाची पाणी साठवण क्षमता पूर्ववत होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून 'ग्रीनथंब' ही संस्था लोकसहभाग घेऊन जलाशय गाळमुक्त करण्यासाठी झटत आहे. खडकवासला प्रकल्पाची जुनी कागदपत्रे शोधून काढून गाळ, पाणीसाठा, रस्ते, वृक्षलागवड इ.च्या माध्यमातून परिसराचे रूप बदलण्यासाठी मांडे यांनी एक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला होता. जे काम जलसंपदा विभागाला जमणार नाही ते काम मांडे यांच्या परिश्रमातून आणि कर्नल पाटील यांच्या संस्थेच्या पाठिंब्याने उभे राहात असल्याचे दिसत होते.

मी नुकताच (२००५) पुण्यामध्ये वास्तव्यासाठी आलो होतो. दीड तपापेक्षा जास्त काळ लोटला आहे. कै.मांडे यांच्याशी ओझरती ओळख होती. एक लग्नपत्रिका व त्याबरोबर जोडलेले सविस्तर पत्र हाती पडले. मांडे यांच्या मुलाचे (?) लग्न असावे. पत्रामध्ये मांडे यांनी स्वतःच्या कुटुंबियाने केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीचा आलेख मांडलेला वाचण्यात आला. दोन जावई, दोन मुली, मुलगा, सून, पुतणे इ. सर्वजण उच्चविद्याविभूषित होऊन भारताबाहेर राहून युरोप, अमेरिकेतील जीवनशैलीच्या अवतीभोवती वावरत असलेला वृत्तांत त्या पत्रात दिला होता. कुटुंबाचा काटछेद समाजापुढे खोलून ठेवण्यात मांडे यांना संकोचाचा लवलेशही शिवला नव्हता. तीनही आपत्यांच्या लग्नाचा वृत्तांत पण ते भूतकाळाशी एकरूप होऊन सांगत असत. लग्नाच्या बातम्या वर्तमानपत्रातून व दूरदर्शनवर झळकल्याच्या आठवणी पण सांगत असत. पाणी आणि लोक, पाणी आणि जनजीवन, व सर्वांसाठी पाणी या तीन विषयातील तत्त्वांचा पाठपुरावा तीन लग्नामध्ये केल्याचा उल्लेख ते करतात. लग्नामध्ये उपस्थित राहिलेल्या मंडळींना चांगल्या पुस्तकाची भेट देण्याचा एक उत्तम पायंडा पण ते पाडत होते. एखाद्याला यामध्ये आत्मस्तुतीची किनार जाणवेल पण त्याची पर्वा मांडे यांना नसावी. दररोज फुले वाहून पूजा करताना निर्माल्य निर्माण होते आणि ते पर्यावरणाला इजा करते याचीही जाणीव त्यांना झालेली होती.

कै.धाराशिवकर यांनी पाण्यावर बरीच पुस्तके लिहिलेली आहेत. 'द्रष्टा अभियंता-सर विश्वेश्वरैय्या' हे धाराशिवकर यांनी लिहिलेले पुस्तक छपाईमध्ये असतानाच दुर्दैवाने त्यांना मृत्यूने जवळ केले. सर विश्वेश्वरैय्या या महान विभूतीवर लिहिलेला मराठी भाषेतील एक दुर्मिळ ग्रंथ म्हणून वाचकासमोर येणे आवश्यक होते. मांडे यांनी पुढाकार घेतला. या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम पुणे येथे त्यांनी घडवून आणला.

डॉ.मोरवंचीकर सरांबद्दल त्यांना खूप आदर होता. सरांनी अनेक ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. अनेकांच्या पुस्तकांना आशीर्वादपर प्रस्तावना दिलेली आहे. सरांच्या या प्रस्तावनेचा एक संच करून पुस्तक स्वरूपात ते वाचकांच्या हाती द्यावे अशी मांडे यांची इच्छा होती. या कामाची त्यांनी सुरूवात केली. 'वारसा पाण्याचा' या माझ्या ग्रंथाला मोरवंचीकर सरांनी मार्गदर्शक म्हणून प्रास्ताविक दिलेले आहे. मांडे यांनी हे प्रास्ताविक हाती घेतलेल्या पुस्तकात समाविष्ट करण्यासाठी घेतल्याचा उल्लेख केल्याचे मला आठवते. हे काम अर्धवट राहिल्याची खंत वाटते.

अलिकडे त्यांच्या लेखणीने गती घेतल्याचे दिसून येत होते. दै.पुण्यनगरीमध्ये दर पंधरा दिवसाला पाण्यावरचा त्यांचा लेख छापून येत असे. तो लेख ते आवर्जून पाठवत असत आणि प्रतिक्रियेची अपेक्षा करत असत. 'जलसंवाद' या मासिकासाठी पण ते लेखन करत होते. त्यांचे लेख मी आवर्जून वाचत असे. त्यांच्या लिखाणात कसदारपणा आलेला दिसून आला. दै.पुण्यनगरीमधील छापून आलेल्या लेखाचे रूपांतरण एका पुस्तकात करण्याची त्यांची मनीषा होती.

गेल्या आठ-दहा वर्षांपासून, मांडे, त्यांच्या एका ज्येष्ठ सहकाऱ्यासमवेत एका ग्रंथाच्या निर्मितीत गुंतलेले दिसले. महाराष्ट्राच्या नागरी पाणीपुरवठ्याचा येत्या पन्नास वर्षांचा वेध घेणारा ग्रंथ ते काढत होते. या विषयात तज्ञता मिळविलेले एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व डॉ.दहासहस्र, यांच्या विचारातून त्या ग्रंथाची निर्मिती होत असल्याचे कळत होते. "IWRM-Mapping Maharashtra's the Most Critical Resource" असे त्या ग्रंथाचे नाव आहे. मांडे या ग्रंथाबद्दल भरभरून बोलत असत. मला मिळालेल्या माहितीनुसार हा ग्रंथ सध्या छपाईमध्ये गेलेला आहे. मांडे अर्ध्यातूनच निघून गेल्याचे दुःख सर्वांना आहे.

मांडे हे एक मनमोकळे व निगर्वी पात्र होते. झाकून काहीही ठेवायचे नाही. जेथे गेले तेथून हाती लागेल ती माहिती घेऊन येण्यास ते विसरत नसत. जे बरोबर आणले ते इतरांबरोबर संवादातून वाटून घेण्याचा उमदा स्वभाव त्यांच्याकडे होता. एखादे पुस्तक, पुस्तकातील उतारा, एखादा लेख असे काही त्यांना आवडले तर ते न

विसरता इतरांना सांगत असत व त्यातून स्वतःसाठी पण आनंद मिळवत असत. स्वतःला मिळालेली माहिती इतरांमध्ये वाटण्याचा दिलदारपणा त्यांच्याकडे होता. ही बाब अलिकडे दुर्मिळ झालेली दिसते. चांगल्या विचारांचं प्रतिबिंब पडलेल्या लेखाची ते भरभरून प्रशंसा करत असत. याचा मला नेहमीच अनुभव येत असे. चेरापुंजीला घनदाट जंगल नाही, तरी पण विपुल (जगात सर्वात जास्त) पाऊस पडतो. अमेरिकेतील कॅलिफोर्निया या आवर्षणप्रवण भागातून जाणाऱ्या कालवा व महामार्गाच्या कडेने वृक्षारोपण केलेले दिसले नाही. अशा सडेतोड मांडणीचे ते कौतुक करत असत. 'कालचा शोध', 'आजचा बोध', 'उद्याचा वेध' घेणारा हा ग्रंथ आहे असे मनमोकळे विचार त्यांनी एका साहित्यनिर्मितीबद्दल काढलेले अद्यापी माझ्या स्मरणात आहे. ते गेले आणि त्यांच्या मित्रपरिवारात पोकळी निर्माण झाली. 'दैवगती न्यारी' असे म्हणून त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होण्याशिवाय आपल्या हातात काहीही राहिलेले नाही असेच म्हणावे लागेल. आलेला प्रत्येक माणूस हा जातच असतो. पण काहींना जीवन कसे जगावे हे कळलेले असते.

*****




**सरकारी नोकरीत वर्ल्ड बँक प्रोजेक्ट्सवर खूप कामे केली. त्या वर्ल्ड बँकेच्या मुख्य कार्यालयासमोर**

# श्री. शरद मांडे - एक आगळं वेगळं व्यक्तिमत्व

**श्री. विद्यानंद रानडे**

**मो : ९८२२७९२७९८**



श्री. शरद मांडे आणि माझी ओळख ही सुमारे २५ वर्षांपासूनची. माझ्या सेवानिवृत्तीनंतर डिसेंबर १९९५ पासून मी पुण्यात स्थायिक झालो. नंतर मी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स पुणे यांच्या कार्यक्रमात भाग घेवू लागलो. त्यावेळी श्री. मांडे हे इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशनचे सचिव असले तरी या संस्थेने आयोजित केलेल्या चर्चासत्रे, परिसंवाद व कार्यशाळा यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असे. अशा कार्यक्रमातून माझा व त्यांचा परिचय झाला. त्यानंतर डॉ. माधवराव चितळे यांनी २०११ साली मला सुचविले की उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाण्याची उपलब्धता, विकास आणि वापर यांचा मी अभ्यास करावा. त्यातून निर्माण झालेले प्रश्न आणि भविष्यातील विकास याच्या अभ्यासासाठी एका **ऐरिया वॉटर पार्टनरशिपची** स्थापना करण्यात यावी असेही सांगितले.

त्यामुळे जलसंपदा विभागातील तसेच पाण्याशी संबंधित इतर विभागातील सेवीनिवृत्त व कार्यरत अभियंते, पाण्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी आणि अर्धशासकीय संस्था यांच्याशी विचार विनिमय करण्यासाठी मी एक बैठक ठरविली. तिच्या आयोजनामध्ये श्री. मांडे यांनी आपणहून सहभाग घेतला. पुढील ३-४ महिन्यात या कामाची दिशा ठरवून विविध क्षेत्रातील अभ्यासाची जबाबदारी ठरविण्यासाठी २-३ बैठका झाल्या. त्यातूनच **उर्ध्व भीमा खोरे जलसहभागितेची** स्थापना होवून Vision for the Development of Upper Bhima Basin by 2025 असा अहवाल तयार करण्याचे ठरले. या कामासाठी दिल्ली येथील संघटनेकडून आर्थिक मदत मिळणार होती. या संस्थेचा सचिव म्हणून काम करण्यास आणि जमा खर्चाचे सर्व काम हे इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशनच्या माध्यमातून करण्याची जबाबदारी त्यांनी आपणहून स्वीकारली. त्यानंतर पुढील जवळजवळ १२-१३ वर्षे खर्चाचा हिशेब ठेवून दरवर्षी त्याचे परिक्षण (Audit) करून घेणे हे काम त्यांनी निर्वेधपणे केले. सार्वजनिक हिताच्या कार्यक्रमात स्वत: जबाबदारी स्वीकारून सहभाग घ्यायचा आणि शेवटपर्यंत तो निभवायचा हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता.

त्यामुळे गेल्या २०-२२ वर्षांमध्ये त्यांच्याशी माझा परिचय दृढ झाला. त्यातून मला जाणवले की एक सदैव दिवसातील १५-१६ तास कार्यरत रहणारा (इंग्रजीत ज्याला Workoholic असे म्हणतात) अभियंता असे वर्णनच त्यांच्या बाबतीत चपखल बसते. सर्वसाधारणपणे असे सतत काम करणारे लोक हे स्वयंमग्न (Self centered) असतात. परंतु श्री. मांडे हे सतत काम करीत असले तरीही सर्व क्षेत्रातील बऱ्याच नावाजलेल्या व्यक्तींशी त्यांचा चांगला परिचय असून जनसंपर्कही मोठा होता. त्यामुळे अभियंत्यांच्या संघटना, भांडारकर इन्स्टिट्यूट, नृपो संघटना, रोझ सोसायटी, जुन्नर येथील शाळेच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना, देशस्थ ऋग्वेदी शैक्षणिक संस्था या सारख्या संस्थांच्या कामामध्ये पण त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यासाठी त्यांनी आर्थिक मदत लागत असेल तर ती करण्याचा आणि इतरांच्या कडून ती मिळवून देण्यामध्येही त्यांचा पुढाकार असे. तांत्रिक आणि इतर विषयांवरील कार्यशाळा, सेमिनार, ब्रेन स्टॉर्मिंग सेशन भरविण्यासाठीचे नियोजन करून त्या यशस्वी करून दाखविण्यामागे तर त्याचा हात कोणी धरू शकणार नाही. श्री. अनिल पाटील यांनी आयोजित केलेला डॉ. देशकर यांचा पंचाहत्तरी निमित्तचा सत्कार समारंभ आणि माझ्या पुस्तकाचा डिसेंबर २०२१ मधील प्रकाशन समारंभ यामध्ये श्री. मांडे यांचा महत्वाचा सहभाग होता.

IWWA चे सेक्रेटरी आणि सेक्रेटरी जनरल असे सुमारे २५ वर्षे काम करतेवेळी त्यांचा अभियांत्रिकी आणि इतर बऱ्याच क्षेत्रातील वरिष्ठ तज्ज्ञ व अभियंत्यांशी त्यांचा दृढ परिचय झाला. त्यांच्याकडे संवाद साधण्याच्या आणि संभाषण चातुर्याच्या असलेल्या कलेमुळे बऱ्याच जणांशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. त्यांच्याशी वेळोवेळी फोनवर संपर्क साधून ते अशा परिचयाला उजाळा देत असत, जागतिक स्तरावरील १० च्या वर आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. त्यावेळी तेथील महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क साधून महाराष्ट्रात व देशात कशी प्रगती झाली आहे याची माहिती ते त्यांना देत असत. त्यामुळे देशस्तरावरच नव्हे तर जागतिक स्तरावरपण त्यांचा फार मोठा संपर्क निर्माण झाला होता.

ही सर्व कामे चालू असताना आणि सल्लागार म्हणून कामे चालू असतानाही त्यांचे तांत्रिक आणि इतर क्षेत्रातील पुस्तकांचे वाचन सतत चालू असे. त्यांच्या आवडत्या विषयावरील एखादे पुस्तक प्रकाशित झाले की ते लगेच विकत आणून ते वाचत असत. त्यांना आवडलेल्या पुस्तकाच्या ८-१० प्रती स्वत: विकत घेवून त्या आपल्या परिचितांकडे पाठवायचे वा नेवून द्यायचे. हल्लीच्या काळात पुस्तके विकत घेवून वाचणारे फार थोडे जण दिसतात आणि स्वत: विकत घेवून दुसऱ्यांना त्याच्या प्रती देणारे श्री. मांडे हे एकमेवच असावेत. मी लिहिलेल्या पाण्या तुझा रंग कसा ? या पुस्तकाच्या १० प्रती त्यांनी राजहंस प्रकाशानाकडून विकत घेतल्या आणि त्यांचे परिचित असलेल्या १० जणांकडे त्या पाठविल्या.

एकदा फोनवर बोलतांना माझ्या पुस्तकाचा समुदा अंतिम

केला असल्याचे सांगितले. ते म्हणाले की त्याची झेरॉक्स प्रत पाठवली तर ते नजरेखालून घालतील. त्यामुळे सुमारे २२० पानांची प्रत मी त्यांच्याकडे पाठवली. त्यापुढे गंमत म्हणजे ८–१० दिवसाच्या आत त्यांनी मला एक ५–६ पानांची हस्तलिखित टिपणी पाठवली. त्यामध्ये मसुद्यातील काही राहिलेल्या शुध्दलेखनाच्या चुका, काही अतिरिक्त माहिती आणि संपादनासंबंधिच्या काही उपयुक्त सूचना अशी सविस्तर माहिती त्यामध्ये होती. मसुद्यातील प्रत्येक परिछेद आणि त्यातील बारकाईने वाचल्याखेरीज या गोष्टी निदर्शनास आणणे शक्य नव्हते. त्या सूचनांनुसार आवश्यक ते बदल मला अंतिम मसुद्यामध्ये करता आले. त्यानंतर मी लिहिलेल्या जलसंपदा विभागाचा इतिहास हा ५२ पानांचा लेख मी २२ भागांमध्ये जून २०२२ मध्ये अभिप्रायासाठी व्हॉटसॲप ग्रुपवर टाकला होता. त्याचा प्रिंटआउट घेवून त्यातील परिच्छेदांवर अधिक माहिती व काही उपयुक्त सूचना केलेली हस्तलिखित ४ पानांची टिपणी त्यांनी मला ५ जुलै २०२२ रोजी पाठविली. त्यानुसार या लेखात मला योग्य ते बदल करता आले. कोणतेही काम ते परिश्रम घेवून आणि किती आत्मीयतेने ते करीत असत हेच यातून दिसून येते.

त्याप्रमाणे त्यांनी पाण्याच्या क्षेत्रात विविध प्रकारे जेवढे प्रचंड काम केले त्या तुलनेने लिखित स्वरूपात असलेले काम त्यांनी कमी केले असे मात्र म्हणावेसे वाटते. कदाचित त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीमुळे आणि त्यांचा लोकसंपर्क बराच मोठा असल्यामुळे त्यांच्यासाठी काम करण्यात त्यांचा बराचसा वेळ जात असावा. गेल्या काही वर्षात मात्र त्यांनी लेखनास सुरूवात केली होती. मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील मोगलकालीन भूजलावर आधारित पिण्याच्या पाण्यासाठी केलेल्या व्यवस्थेचा सखोल अभ्यास करून लिहिलेले तीन लेख एका पुस्तकात अंतर्भूत झाले आहेत. अमेरिकेत गेले असताना त्यावेळी एक मोठे घरण फुटण्यापासून त्यांनी वाचविले याबद्दल त्यांचा एक छान लेख आला होता. अगदी अलिकडे म्हणजे जानेवारी २०२२ पासून त्यांनी पुण्यानगरी दैनिकात दर पंधरवाड्यास पाण्यासंबंधी विषयावर एक लेख याप्रमाणे १४ लेख लिहिले आणि त्यापुढेही हे वर्षभर लेख लिहिण्याची त्यांची तयारी झाली होती. पण संकल्प आणि सिध्दी यामध्ये परमेश्वराची इच्छा असते हेच खरे !



त्यांचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे फोनवरील संभाषणाची त्यांची कला किंवा पध्दती ! त्यांचा फोन आला किंवा आपण त्यांना केला तर ते संभाषण कमित कमी १५ मिनीटे ते अर्धा तास चालू राहील याची निश्चिती असे. मागील वेळी फोनवर बोलल्यानंतर ज्या ज्या घटना घडल्या असतील त्याचा बारीकसारीक तपशील ते अस्खलितपणे सांगत असत. मला नेहेमी आश्चर्य वाटत असे की त्या साऱ्या गोष्टी न विसरता सलगपणे कशा बोलून दाखवितात ! त्यांच्या संभाषणात एकही वावगी किंवा विषयाशी संबंधित नसलेली गोष्ट येत नसे हे पण त्यांचे वैशिष्ट्य. एकातून दुसरी गोष्ट आपोआप येत असे. डॉ. मोरवंचीकर यांच्याशी फोनवर वा समक्ष झालेल्या चर्चेचा उल्लेख त्यांच्या संभाषणात नेहेमी येत असे. अलिकडच्या काळात डॉ. दहासहस्त्र यांच्याबरोबर IWRM for Urban Area of Maharashtra State for the Next 50 years या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या माहितीचे विश्लेषण करून लिहीत असलेल्या संदर्भग्रंथाबद्दलची माहिती ते नेहमी सांगत असत. अर्थात त्याचे होणारे प्रकाशन हा त्यांच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरणार आहे हे मात्र निर्विवादपणे खरे आहे !

ज्या इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशनमध्ये सेक्रेटरी म्हणून २५ वर्षे अखंड काम केले त्या कै. शरद मांडे यांच्या स्मरणार्थ दिनांक १० डिसेंबर या त्यांच्या जन्मदिनानिमित्त १०.१२.२०२२ पासून दरवर्षी श्री. शरद मांडे मेमोरिअल लेक्चर आयोजित करण्याचे असोसिएशनने ठरविले आहे. त्या निमित्ताने श्रोत्यांना त्यांच्या अजोड व्यक्तिमत्वाची ओळख होईल आणि विविध तांत्रिक विषयावर तज्ज्ञांची भाषणे ऐकण्याचे समाधान पण मिळेल.

विविध विषयांवरील तांत्रिक गोष्टींबद्दल चर्चासत्रे व कार्यक्रम आयोजित करताना निरपेक्ष बुध्दीने त्यामध्ये आपले सर्वाथाने योगदान देण्याचा वसाच त्यांनी आयुष्यभर घेतला होता. त्यांनी घालून दिलेला हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकाने जर आपल्या क्षमतेनुसार अशा उपक्रमांमध्ये आपला सहभाग घेवून योगदान देण्याचे ठरवून काही कृति केली तरच ती कै. शरद मांडे यांना खरी श्रध्दांजरी ठरेल असे मला वाटते.

*****

# हेलो... मी मांडे बोलतोय

**श्री. कमलकांत वडेलकर**

**मो : ८६५२८४५९३९**



Hello, this is Arun Mande, son of Mr. Sharad Mande. He had brain stroke few days back and since then he is bedridden. His condition is now critical. He is currently in the nursing care. Regards, Arun

रविवार. दि २१ ऑगस्ट. बरोबर दहा वाजून पन्नास मिनिटांनी हा निरोप माझे मित्र श्री व ना शिंदे यांच्याकडून आला. मित्र शरद मांडे यांचे चिरंजीव अरुण मांडे यांनी तो निरोप पाठवला होता.

घरातूनच आलेला निरोप असल्याने तो खराच असणार शिवाय बरेच दिवस त्यांचा फोन आलेला नव्हता. मी त्या दिवशी मुंबईत होतो. एका अभियंत्याकडे बसलो होतो. योगायोगाने ते मित्र देखील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स शी संबंधित असल्याने ही बातमी ऐकून तेही हळहळले. आमच्या दोघांचाही गप्पांचा विषय अर्थातच शरद मांडे यांच्या कडे वळला.

आम्ही दोघांनीही मग त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. दवाखान्यात जाऊन आजच त्यांची भेट घेऊ या विचाराने मी पुण्याकडे निघालो. पश्चिम मुंबईतून पूर्व मुंबईत येता येता मला चार वाजले होते. आणि एक फोन आला. मांडे साहेब गेले. मी सून्न झालो. हळू हळू काळजीपूर्वक मोटार चालवत पुण्यात पोहोचलो. नेहमीप्रमाणे चांदणी चौकात झालेल्या रहदारीच्या कोंडी मुळे वेळेवर पोहोचू शकलो नाही आणि शरदरावांच्या अंतीम दर्शनाला मुकलो.

हे लिहित असताना मला तर त्यांची आठवण तीव्रतेने येतच आहे पण असं सविस्तर तपशीलवारपणे प्रवासाचं वर्णन करणारी, (तीही फोनवर) शैली तुम्हाला नक्कीच आठवली असेल. किंबहुना फोन कानाला लावल्याबरोबर मांडे बोलतोय हे शब्द ऐकल्यावर अंगावर उभा राहिलेला काटाही आठवला असेल. दैनिक पुण्यनगरीत १जानेवारी २२ पासून पाणी कालचे,आजचे आणि उद्याचे या सदरात त्यांची लेखमाला प्रसिद्ध होऊ लागल्यापासून त्यांचा असा फोन अलिकडे येत नव्हता मात्र. सकाळी सकाळी या लेखाचा फोटो मात्र वाट्स अप वर ते न चुकता मला पाठवत असत.

स्व शरद मांडे यांच्या अभियांत्रिकी कौशल्याबद्दल, त्यांच्या शासकीय सेवेबद्दल, इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनियर्स या संस्थेत आयोजित होणाऱ्या अभियंत्यांना उपयुक्त असलेल्या व्याख्यानायोजनाबद्दल, महाराष्ट्रातल्या, देशपातळीवरच्या आणि थेट वैश्विक संदर्भ असलेल्या पाणी या विषयाशी निगडीत संस्थांतील त्यांचा सक्रीय सहभाग इ.बाबतीत मी लिहिणार नाही. हे आणि असे संदर्भ या विशेषांकात पाना पानावर पहायला मिळतील. माझी आणि स्व शरद मांडे यांची ओळख झाली. ओळखीचे रुपांतर परिचयामध्ये झाले. हा परिचय पुढे एका निरपेक्ष आणि खऱ्या मार्गदर्शकाची भूमिका करणाऱ्या मैत्रीत झाला. या मैत्रीने अनेकदा मला समृद्धीचा अनुभव दिला. मांडेंमुळे मिळालेल्या या अलौकिक समृद्धीच्या भेटींचा उल्लेख आठवणींचा जागर करणाऱ्या या लेखात मी मांडणार आहे . मांडेंशी माझी ओळखच मुळी एका अलौकीक अर्थाने संमृद्ध असलेल्या माणसाने करून दिली होती. डॉ माधवराव चितळे हे त्यांचे नाव. निमित्त होते एका जागतिक पातळीवरच्या परिषदेचे. पुणे येथील एका पंचतारांकित हॉटेलात ही परिषद आयोजित करण्यात आली होती. आयोजकांमध्ये प्रमुख होते अर्थातच शरद मांडे.

या भव्य आणि दिव्य अशा समारंभाला आपण उपस्थित आहोत, पाणी या विषयावर होणाऱ्या जागतीक पातळीवरच्या मंथनाचे आपण साक्षीदार होत आहोत अशा विचाराने माझं मन संमृद्धीचा अनुभव घेत होतं या संपूर्ण समारंभात शरद मांडे यांचं वावरणं, बोलणं, व्यवस्था करणं हे मी पहात होतो. हातात एक छोटीशी ब्रीफकेस घेऊन सगळीकडे गंभीर चेहेऱ्याने वावरणारी मांडे मूर्ती मला आजही आठवते. या समारंभात त्यांनी माझा परिचय दक्षिण आफ्रिकेहून आलेले जलतज्ज्ञ मोदादुल्ला, पाकिस्तान हून आलेले करामत अली आणि सीमी कमाल यांच्याशी करून दिला होता. पुढे नंतर मी मांडेंचा संदर्भ देऊन या महानुभावांशी फोनवर बोललो होतो. अभियंता मित्र मधील लेख वाचून ते मला नियमीतपणे अभिप्राय तर देत असतच पण परस्पर लेखकाचेही कौतुक करून त्याचा उत्साह वाढवत असत.

मुंबई येथील हॉटेल लिला इंटरनॅशनल मध्ये झालेल्या समारंभात पाणी क्षेत्रात काम करणाऱ्या राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या अनेक लोकांचा मला परिचय करून घेता आला याचं श्रेय मित्रवर्य डॉ संजय दहासहस्त्र यांना मी देतो पण या समारंभानंतर प्रथेप्रमाणे आयोजीत केलेल्या तांत्रिक भेटीला मात्र मला जाता आले हे केवळ मांडेंमुळे शक्य झाले झाले. लोणावळ्याजवळील सहारा लेक सिटी पहाणे ही ती अनोखी भेट होती. अती महत्वाच्या व्यक्तींना सुद्धा परवानगीच्या अनेक पायऱ्या चढून देखील भेट देऊ इच्छिणाऱ्याच्या पदरी निराशाच यायची अशी अवस्था असतांना शरद मांडे यांनी मात्र ती परवानगी थेट सुब्रतो मुखर्जी यांच्या कडून मिळवली होती. महाराष्ट्रभरातील आणि देशभरातील अनेक चिकित्सक अभियंत्याना विशेषतः पाणी अभ्यासकाना हे अनोखे शहर पहायला आणि अभ्यासायला मिळाले होते. नंतर अनेक प्रकारे विविध प्रकारच्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सहारा संबंधी बातम्या वाचतांना ऐकतांना ती भेट आठवत रहाते. याच सहारा लेक सिटीत माझी भेट

झाली होती ठाणे येथील एका विकासकाची. या भेटीचे रुपांतर पुढे एका निरपेक्ष अशा मैत्रीत झाले. पुढे  माझ्या एकूणच जगण्यावर एक अकल्पीत संकट आलं . त्या सर्व विलक्षण परिस्थितीतून बाहेर काढून सर्वतोपरी सहाय्य करणारी ती व्यक्ती म्हणजे श्री चंद्रकांत भिडे. मांडे मला भेटले नसते तर भिडे भेटले नसते आणि भिडे भेटले नसते तर मांडेंच्या आधीच मी हे जग सोडून गेलो असतो. म्हणून मी त्यांच्या ऋणात राहिलो आणि आजन्म राहीन.

अशीच एक आठवण हैद्राबाद ची आहे. आयवाचा वार्षिक कार्यक्रम होता. स्वतः पुढाकार घेऊन मला माध्यम प्रतिनिधी म्हणून येण्यास सांगीतले व माझी तेथील सर्व व्यवस्था त्यांनी केली होती. शेवटच्या दिवशी आयोजीत केलेल्या  सांस्कृतीक पार्टित भेटलेले जगप्रसिद्ध उर्दू शायर आणि हिंदी कवी, त्यांच्या ग़ज़ल आणि कविता ऐकण्याची संधी  मला मिळाली, मी समृद्ध झालो. याच दौऱ्यात रामोजी फिल्म सिटी मला पहाता आली . हैदराबाद च्या आसपास असलेले डोंब पहाता आले. हुसेन सागर चे दर्शन घेता आले. हे मांडेंमुळे शक्य झाले.

लौकिकार्थाने हा माणूस संपादक नव्हता, लेखकही नव्हता पण साहित्य व्यवहारात प्रामाणिकपणे वावरणाऱ्या लेखकांना आणि संपादकांना प्रोत्साहीत करणारा एक सच्चा वाचक होता. अभियंता असला तरी केवळ अभियांत्रिकीच्या  साहित्यात न रमता ललित साहित्यातही लुडबुड करणारा एक चोखंदळ वाचक होता. आणि मराठी साहित्यातल्या मोठमोठया माणसांमध्ये त्यांची ऊठ बैस होती.

बा भ बोरकर यांच्या कवितेतील एका  ओळीत बदल करून दिलेल्या शिर्षकाचे पुस्तक मी संपादित केले आहे. गेलेल्या विकासकर्मींच्या जीवनावर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ आहे. याच्या प्रकाशनाला आपण बोरकरांच्या पुतण्याला बोलवू जे स्वतः एक उत्तम कवी आहेत, यासाठी ते आग्रही होते.  डॉ घनःशाम बोरकर हे त्यांचे नाव. बोरकरांना लगेच फोन लावला. मला बोलायला सांगीतले. ते हो म्हणाले. प्रकृती अस्वास्थ्य आणि कोरोनाचा प्रभाव यामुळे ते येऊ शकले नाहीत. पण केव्हढी ही धडपड. किती काकुळती. त्यांना कमी ऐकू येत होते. पण  त्यांनी ऐकून खूप ठेवलं होतं.  ते बहुश्रुत होते. आणि म्हणून ऐकवायला नेहमी सज्ज असायचे. ऐकवण्यासाठी असायला पण हवे ना. ऐकवण्याची त्यांची एक पद्धत होती. एखाद्या किर्तनकाराला किंवा कथा कथन करणाऱ्याला शोभेल अशी.

बारिक आणि लौकिकार्थाने किरकोळ वाटणारी शरीरयष्टी, अतीशय साधी रहाणी, हातातली ती छोटीशी ॲटॅची...हा माणूस आर्थिक अंगाने गरिब असावा  असे वाटण्या इतपत  साधा. पण त्यांच्या वेगळ्या घाटनीने  बांधलेल्या प्लॅस्टर न केलेल्या भिंती असलेल्या तीन मजली घरी गेल्यावर हा गैरसमज लगेच दूर व्हायचा. दिवाणखान्यात व्यवस्थितपणे सजवलेल्या देखण्या वस्तूंकडे तसेच दैनिके आणि मासिके यांच्याकडे एक  दृष्टीक्षेप टाकल्यावर आणि तिसऱ्या मजल्यावर असलेल्या विकत घेतलेल्या आणि भेट म्हणून आलेल्या सर्वच विषयावरच्या  ग्रंथांच्या संग्रहाला भेट दिल्यावर तर हा माणूस खूपच श्रीमंत आहे असे वाटायचे.

वेग वेगळ्या विषयांवरील नवीन पुस्तके वाचताना बुद्धी ताजी तवानी राहते असे त्यांचे विचार होते म्हणून एखादे नवीन पुस्तक आले की ते लगेच मिळवायचे आणि मिळवायला सांगायचे, प्रसंगी त्या त्या विषयाची गोडी असलेल्या मित्रांना भेट म्हणून पाठवून द्यायचे. मी उर्दू भाषेचा चाहता आणि अखंड विद्यार्थी असल्याने त्यांनी मला  डॉ राहत इंदौरी चे निधन झाले तेव्हा त्यांचा शेरी मजमुवा (कविता संग्रह) नाराज पाठवून दिला होता. जगप्रसिद्ध उर्दू शायर प्रो  वसीम बरेलवी यांचा चराग हा संग्रह पाठवून दिला होता तर पाकिस्तान च्या पाणीवाल्या बाई सीमी कमाल यांच्या सांगण्यावरून अहेमद फराज यांचा खाना बदोश हा फराज यांचे सर्व शेर एकत्र असलेला संग्रह पाठवला होता. डॉ राहत  इंदोरी यांचा हा चिराग मला मांडे यांची सतत आठवण करून देईल. विकास वाटेवरील प्रवासात दीपस्तंभाचे काम करेल. संपादक डॉ दत्ता देशकर यांनी मला जेव्हा जलसंवाद साठी पाणी आणि उर्दू शायरी हे सदर लिहायला सांगितले तेव्हा मला या पुस्तकांचा फार उपयोग झाला होता.

प्रसंगपरत्वे त्यांनी पाठवलेली ही काही पुस्तकं. डॉ घनःशाम बोरकर यांचं खेळिया, ओमप्रकाश नय्यर यांच्यावरील सतीश पाकणीकर यांनी संपादित केलेलं पुस्तक. महाराष्ट्राची चित्रमय ओळख करुन देणारं उद्धव ठाकरे यांचं महाराष्ट्र देशा इ.किताबे इश्क से बढकर कोई किताब नही. असं म्हणून गेले ते या निमित्ताने. अर्थात या अलौकिक श्रीमंतीचे फार मोठे श्रेय हे त्यांच्या कुटुंबात असलेली लक्ष्मी. त्यांची धर्मपत्नी......

त्यांच्या घरी जाण्याचे प्रसंग फार कमी येत असत कारण तेच बहुदा  बाहेर असत. प्रसंगानुरुप तसेच आवश्यकतेनुसार तेच संबंधितांच्या घरी किंवा कार्यालयात जात असत. पायात घुंगरु बांधून फिरणे ही म्हण यांच्या बाबतीत अगदी फिट्ट  बसायची. २००४ साली आम्ही आयोजित केलेल्या अखील भारतीय जल साहित्य संमेलनात अभियंता मित्र चा पाण्यावरच्या कविता असलेला कविता विशेषांक असो की कृत्रीम पाऊस पाडण्यावरील विशेषांक असो, आक्रोश शुष्क नद्यांचा हा अवर्षण प्रवरणावरील अंक असो अशा अनेक अंकांसाठी स्वतःहून पुढाकार घेऊन  मजकूरा पासून ते  जाहिरात देऊन सहयोग देणारे  मांडे यांना माझ्यासारखा संपादक कसा विसरेल.

जगभर हिंडणारा, विपूल वाचन असलेला अनेक विषयांचा अभ्यास असलेला, एका  विशिष्ट तळमळीचा एक डोळस माणूस जेव्हा आपल्या उपक्रमात निरपेक्ष हेतूने सक्रिय  सहभागी होऊन आपली पाठ थोपटतो तेव्हा आपल्या प्रवासाची दिशा नीट आहे या गोष्टीचा  विश्वास वाटायला मदत होते .  ते धर्मवेडे नव्हते पण नास्तिक देखिल  नव्हते. विश्वात्मक विश्वेशराच्या स्मरणाचा  आनंद मात्र ते घ्यायचे.

त्यांचा  नातू चि सोहम् च्या मौंजी बंधनाच्या वेळी त्यांनी त्याला लिहिलेलं पत्र, पत्रव्यवहाराचा एक उत्तम नमुना मला वाटतो. ते पत्र मी आमच्या एका अंकात प्रसिद्ध  केलं होतं. ब्राम्हणेतर असलेल्या अनेक  वाचकांनी त्याचे जतन करून ठेवल्याचे मला  नंतर समजले . अशा अनेक आठवणी आहेत मांडे महाशयांच्या संदर्भात.

माणसांच्या श्वासांना मर्यादा असते. त्यांचे पृथ्वीवरील श्वास संपले ते गेले. पण आठवणी कितीही असल्या, कितीही हृदयस्पर्शी असल्या तरी त्यांना शब्दबद्ध करायला मर्यादा असतात, म्हणून त्या मर्यादांचा आदर राखून, शरद मांडे यांना श्रद्धांजली अर्पण करून येथे थांबतो.

# श्री. शरद मांडे यांना श्रध्दांजली

**श्री. हरीष बुटले**

**मो : ९४२२००१५६०**



आदरणीय स्व. शरद मांडे साहेबांच्या निधनाची वार्ता हा माझ्यासाठी एक मोठा धक्का होता. कारण १५-२० दिवसांपूर्वीच त्यांच्याशी खूप सविस्तरपणे बोलणे झाले होते. मांडेसाहेब हे 'तुम्ही आम्ही पालक' मासिकाचे एक लेखक देखील होते. प्रत्येक अंक ज्या पद्धतीने एकेका विशिष्ट विषयाची बांधणी करून आम्ही तयार करतो, त्याचे त्यांना फार कौतुक होते. त्यांचा आणि माझा परिचय आदरणीय डॉ. अलकाताई मांडके यांच्यामुळे झाला. साधारण दोन वर्षापूर्वी माझी मुलगी श्रद्धा शिकागोला पदवीसाठी शिकायला जाणार होती त्यावेळेचा तो परिचय. साहेबांचे चिरंजीव अरुणदादा शिकागोला आहेत. तिला त्यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले.

स्व.मांडे साहेबांचा परिचय यानिमित्ताने झाला असला, तरी त्यानंतर त्यांची आणि माझी साधारण ५-६ वेळा वैयक्तिक भेट झाली. घरी तीनदा आणि कार्यक्रमांमध्ये तसेच ते एकदा आमच्या कार्यालयातही येऊन गेले. असे असले तरी मागील दीड वर्षात फोनवरून त्यांच्याशी १०-१२ वेळा किमान अर्धा तास आणि कमाल दीड तासापर्यंत बोलणे झाले. मांडेसाहेब फार लाघवी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याशी बोलताना एका गोष्टीची खात्री व्हायची, की सामाजिक पालकत्वाच्या दृष्टीने मासिकाच्या माध्यमातून आपल्या हातून नक्कीच भरीव अशी कामगिरी होत आहे. डॉ. रोहिणी व माझ्या लग्नाच्या २५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने तयार झालेल्या अंकाच्या निमित्ताने ते त्यांच्या अरुणराव व पुष्पलता प्रभुणे या मित्रांच्या ५० वर्षांच्या सहजीवनाविषयी खूप सांगायचे. त्यांची आमच्याशी त्यांना विशेष भेट घालून द्यायची होती. मात्र नियतीला कदाचित ते मंजूर नव्हते.

श्रद्धा दीड वर्षानंतर पुण्यात आलेली होती. तिची आणि मांडे साहेबांची भेट घालून देण्यासाठी आठवड्यापूर्वीच मी फोन केला; मात्र प्रकृती-स्वास्थ्य बरे नसल्याने भेटता येणार नाही, असे फोनवरून कोणीतरी सांगितल्याने आम्ही भेटू शकलो नाही. नियतीच्या मनात असे काही आहे, याची पुसटशी कल्पनाही आम्हाला नव्हती; मात्र एका ज्येष्ठ मार्गदर्शकाला मुकल्याची सल आता कायम मनात राहील. येत्या दिवाळी अंकात स्व. शरद मांडेसाहेबांची आणि माझी ज्या विषयांवर चर्चा व्हायची, ते सर्व मुद्दे सविस्तरपणे मांडीनच!

त्यांचेच सहकारी आणि 'जलसंवाद' मासिकाचे संपादक आणि माझे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय दत्ता देशकर काकांनीदेखील मांडेसाहेबांविषयी एका विशेष मासिकाचे नियोजन केलेले आहे त्यासाठी माझ्या भावना व्यक्त करतो आहे.

'तुम्ही-आम्ही पालक' मासिकाचे राज्यभरात जे हार्डकोअर चाहते आहेत त्यांच्यापैकी खूपच वरच्या क्रमांकावर आदरणीय स्व.शरद मांडे साहेबांचे नाव होते. त्यांच्या आणि माझ्या ओळखीच्या फारच थोडया अश्या २ वर्षांच्या कालावधीत ते माझे २०-३० वर्षाचे जुने ज्येष्ठ स्नेही असावेत अशा तऱ्हेचे वागणे बोलणे असायचे. त्यांनी मला ज्या-ज्या वेळी फोन केला त्या-त्या वेळी किमान अर्धा तर जास्तीत जास्त ९० मिनिटांचे बोलणे व्हायचे. बोलताना त्या त्या महिन्याच्या अंकाच्या काही विशिष्ट लेखातील बारकावे सांगायचे. त्यांना माझी संपादकीय भूमिका आणि त्यामागची पार्श्वभूमी खूप जास्त भावायची. त्याचबरोबर प्रत्येक अंकासाठी निवडलेले वेगवेगळे विषय हे त्यांच्यासाठी कौतुकाचे असायचे. सगळं बोलणं झाल्यावर ते अंक किती वितरीत होतो आणि त्याच्या आर्थिक गणिताविषयी बोलायचे. त्यावेळी मात्र त्यांची खूप निराशा व्हायची आणि ते समाजाला दोष द्यायचे. चांगलं आणि वाईट यातील सीमारेषा आता धुसर झाल्याची त्यांना खंत असायची.

'तुम्ही-आम्ही पालक' सारखे मासिक समाजाच्या सर्व स्तरात पोहचल्यास एक उत्तम असे सामाजिक पालकत्वाचे कार्य सिध्दीस जाईल अशी त्यांची धारणा होती. त्यातून ते स्वतः या मासिकाचे सभासद होण्याविषयी अनेकांना सांगायचे. ज्यावेळी या मासिकाला १०० अंकानंतर डिजिटल स्वरुप द्यायचे मी ठरवल्याचे त्यांना कळले, त्यावेळी त्यांनी मला मोठा धीर दिला. ते म्हणाले की या चांगल्या कामासाठी कोणीतरी नक्की उभे होईल. त्यांच्या मनातील भावना अतिशय निर्धोक व निर्विवादपणे मांडायचे. अति 'रंजित' दिसले गुरुजी हा संपूर्ण अभ्यासपूर्ण आणि सर्व पुराव्यांनिशी लिहलेल्या 'ग्लोबल गुरुजी' विषयी लिहिलेल्या लेखावर ते माझ्याशी तब्बल तासभर बोलले. त्यांनी माझ्या शोधपत्रकारितेचे आणि धाडसाचे कौतुक केले. असाच दुसरा एक लेख जो सामाजिक क्षेत्रातील अपप्रवृत्तीबद्दचा होता, तो त्यांच्या वाचनात आला नाही; मात्र त्यांचा कानावर त्या 'मास्तर' या लेखात मी खूप मोठ्या प्रमाणावर धक्कादायक आणि कोणाची तरी प्रतिमा मालिन करण्याच्या हेतूने लिहिलं आहे असे त्यांच्या हितचिंतकांकडून कळले. मात्र त्यांना मी उगाचच असे काहीतरी करणार नाही याविषयी कमालीची खात्री होती. त्यामुळे त्यांनी तो लेख माझ्याकडून मागवून घेतला व खातराजमा केली आणि माझ्या निर्भीड सामाजिक बांधिलकीबद्दल दाद दिली. मात्र त्या विषयावर आम्हाला आणखी खोलात जावून बोलायचं राहूनच गेलं.

स्व.शरद मांडे साहेबांचे त्यांच्या शाळेवर अतिशय निस्सीम प्रेम होते. त्यांना स्वतःला जुन्नरच्या बुट्टे पाटील शाळेचा विद्यार्थी

असल्याचा मोठा अभिमान होता. गुरुवर्य रा.प.सबनिसांनी स्थापित केलेल्या या शाळेच्या १२ वी सायन्सच्या विद्यार्थ्यांना 'डीपर'च्या व ५वी आणि ८वी च्या विद्यार्थ्यांना 'महाएक्झाम' परीक्षांचा लाभ मिळावा असे ते वारंवार सांगायचे. त्यासाठी मला त्यांच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांशी बोलायला घेवून जाण्यासंदर्भात ४-५ वेळा बोलले होते. मात्र आमच्या अतिशय अल्प अशा २ वर्षाच्या ओळखीत ते शक्य झालं नाही कारण त्यापैकी जवळपास दीड वर्षाचा कालावधी तर कोरोनाच्या संकटातच गेला.

त्याचप्रमाणे आमच्या 'साद माणुसकीची फाउंडेशन' च्या माध्यमातून साकार केलेल्या 'सादग्राम' संकल्पनेविषयी त्यांना फार कौतुक होते. अनिवासी ग्रामवासींनी आपल्या गावाविषयी व विशेषकरुन शाळेविषयी आस्था दाखवायला हवी यासाठी त्यांचा आग्रह होता. त्यासाठी ते त्यांच्या माजी विद्यार्थ्यासोबत माझा संवाद घडवून आणणार होते. मात्र त्यांच्या अचानक निघून जाण्याने ते राहूनच गेले. त्यामुळेच जुन्नरला झालेल्या त्यांच्या श्रध्दांजली सभेला आदरणीय दत्ता देशकर काकांसमवेत आवर्जून उपस्थित राहून त्यांच्या मनातील ज्या भावना होत्या त्यासाठी कृतज्ञता व्यक्त केली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्य ७५ ग्रंथालयांना 'तुम्ही-आम्ही पालक' मासिकाचे ७५ अंक देण्यासंदर्भात केलेल्या संकल्पातील पहिला संच बुट्टे पाटील संस्थेच्या ग्रंथालयाला भेट दिला. स्व.मांडे साहेबांच्या मनातील इच्छेनुसार त्यांच्या शाळेची गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने जे शक्य आहे ते सहकार्य करणे हे मी आता माझे इतिकर्तव्यच समजतो.

स्व.शरद मांडे साहेबांचे क्षेत्र जलव्यवस्थापनाचे त्या क्षेत्रात त्यांची रुची, आवड आणि कार्य उत्तुंग होते. त्यांच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामाचा अनुभवही तेवढाच दांडगा होता. त्या सर्व अनुभवांना शब्दबध्द करण्यासाठी आदरणीय दत्ता देशकर काकांनी त्यांच्या 'जलसंवाद' या मासिकातून विस्तृतपणे लिहायला गती दिली. त्यामुळे मांडे साहेबांच्या अनुभवाचा खजिना सर्वासमोर आला. स्व. मांडे साहेबांनी काही लेख 'तुम्ही-आम्ही पालक' मासिकासाठी देखील लिहले आहेत.

या अंकात स्व.मांडे साहेबांच्या कर्तृत्वाविषयी अनेकांनी भरभरून लिहलेले आहेच. मी माझ्या लेखाची व्याप्ती त्यांच्या आणि माझ्यात वेळोवेळी झालेल्या संवाद आणि तत्सम बाबीपुरती मर्यादित ठेवली आहे.

सरतेशेवटी त्यांच्यात आणि माझ्यात शेवटच्या २-३ फोनवरील संवादातून २०२५ नंतर मो माझ्या पुढील आयुष्यात जे करणार आहे त्याविषयी भरभरून बोललो. नीती आणि मूल्ये जोपासणारी शिक्षकांची फळी निर्माण व्हावी त्यासाठी शिक्षक प्रशिक्षणासाठी लागणार्या एकेका बाबीची गुंफण करताना जे काम सुरु होईल त्यावर विस्तृत चर्चा झाली. त्यातच ग्रामविकासाच्या दृष्टीने ग्रामीण तंत्रज्ञान प्रशिक्षण व त्या अनुषंगाने ज्या गोष्टी कराव्या लागतील त्या करणे कसे उपयुक्त राहील त्यावर ते भरभरून बोलत. या सर्व बाबतीत त्यांना भविष्यात भरीव योगदान द्यायचे होते. किंबहुना ते मला सातत्याने सांगायचे की अशा कामासाठी अदृश्य अशा शक्ती आपोआपच उभ्या राहतील. कारण जे करायचे आहे ते गुणवत्तापूर्ण व व्यापक जनहितासाठी असल्याने त्यात सर्वसामावेशक असा पाठिंबा जरूर मिळेल.

७ डिसेंबर २०२१ ला आमच्या लग्नाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्य जो अंक तयार केलेला होता त्या अंकाच्या निमित्याने डॉ. रोहिणी विषयी ज्या पध्दतीने ती व्यक्त झालो ते त्यांना खूप भावले व त्यांनी त्यांच्या सहजीवना संदर्भातील काही दाखले दिलेत. त्यांच्या मित्राच्या ५० व्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्य तयार केलेल्या पुस्तीकेतील पाठवलेला एक उतारा हा मला आलेला त्यांचा शेवटचा मेसेज. केवळ २ वर्षाच्या अल्पशा अशा कालावधीतील स्व. शरद मांडे साहेबांच मिळालेला अल्पसा सहवास, त्यांचे मार्गदर्शन आणि विशेषकरुन जे आजपर्यंत माझ्या हातून घडलेलं काम आहे त्याविषयीची कमालीची आत्मीयता आणि त्याचे कौतुक कायम मनात घर करुन राहील. मी कायमस्वरुपी त्यांच्या कौतुकाच्या ऋणात कृतज्ञवत राहून आमच्या कामाविषयी त्यांच्या ज्या इच्छा होत्या त्या फलद्रूप कशा होतील त्यासाठी सातत्याने प्रयत्नरत राहील. स्व. शरद मांडे साहेबांना 'तुम्ही आम्ही पालक' मासिक, डीपर, सर फाउंडेशन, साद माणुसकीची फाउंडेशन या संस्था आणि वैयक्तिक आम्हा बुटले कुटुंबीयांकडून भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होतो हीच परमेश्वराकडे प्रार्थना. मांडे कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोतच. परमेश्वर हे दुःख सहन करण्याची त्यांना शक्ती देवो !!!

*****



**केनडी परफॉर्मन्स सेंटर, वॉशिंग्टन डी सी**

# अखंड कार्यरत असलेले कै. शरद मांडे

**श्री. अरुणचंद्र पाठक मो : ९६१९०४६०६९**

शरद मांडे यांच्याशी माझा स्नेह जुळला तो डॉ. रा.श्री. मोरवंचीकर यांच्यामुळे. मी प्रवरा गॅझेटिअर ही संकल्पना राबवायला घेतली त्यावेळी श्री. मांडे त्या कामाने खूप प्रभावित झाले. त्यांनी ते पूर्ण पुस्तक प्रकाशनापूर्वी वाचून आवश्यक त्या सूचना केल्या, शिवाय श्री. माधवराव चितळे यांच्याशी संपर्क साधून एक महत्वाचे काम श्री. पाठक करत आहेत हे त्यांच्या लक्षात आणून दिले. शरद मांडे यांचे व्यक्तिमत्व अत्यंत आकर्षक होते. सडसडीत बांधा, नजरेत भरेल अशी उंची, धारदार नाक, कुरळे केस, अतिशय व्यवस्थित व टापटीपीची राहणी आणि माणसे जोडून घेण्याचा स्वभाव ! त्यांना बोलायला खूप हवे असे. एखाद्या विषयावर विविध अंगांनी व वेगवेगळ्या पैलूंवर ते बोलत असत. त्यांचा मुलगा अरूण व मुलगी गीता यांचा उल्लेख त्यांच्या बोलण्यात वारंवार येत असे. ती दोघेही जण अमेरिकेत स्थायिक झालेली असल्याने स्वाभाविकच त्यांचे जगभर फिरणे होत असे. त्यांच्याकडे जल अभियांत्रिकीचे चांगले ज्ञान होते व एक्झिक्युटीव्ह अभियंता म्हणून केलेल्या कामामुळे त्या क्षेत्रातील त्यांचा अनुभव भरपूर होता. आपलव्या गर्भश्रीमंतीचा कुठेही अभिनिवेश न बाळगता जे चांगले असेल, उत्कृष्ट आहे, ते समजून घ्यावे, चांगल्या गोष्टींचा स्वत:कडे संग्रह करावा व कोणतेही काम दर्जेदार झाले पाहिजे यासाठी प्रसंगी पदरमोड करून ते करून घ्यावे अशी त्यांची वृत्ती होती. वडील मुख्याध्यापक होते त्या जुन्नर येथील शाळेत ते नेहमीच जात असत. तेथे ते काही ना काही कार्यक्रम नेहमीच घडवून आणत असत. जगभरातील पाणी व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या बऱ्याच संघटनांशी त्यांचा स्नेह जुळलेला होता. स्वत:ला कायम व्यस्त ठेवण्यासाठी अखंड प्रवास करणे व वेगवेगळे उपक्रम हाती घेवून ते राबवणे अशा गोष्टी ते करत असत. शासकीय सेवेतील निवृत्तीनंतर या कामांनी गती घेतली व वयाच्या साधारण ८० व्या वर्षापर्यंत म्हणजे निवृत्तीनंतर साधारणपणे २०-२१ वर्षे स्थिर बसले आहेत असे पाहायला मिळाले नाही. आपला मुलगा, चि. मुलगा अरूण व अवंती यांच्या विवाल्निमित्त डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी लिहिलेल्या पंचशील – नव्या युगाचे या पुस्तिकेच्या किमान हजार तरी प्रती काढून त्या वितरित केल्या, ते खूपच भावनाप्रधान स्वभावाचे होते. चि. अभिजित व गीतांजली यांचा विवाह सोहळा होता. तेव्हा लाडक्या लेकीस या नावाने एक कवितासंग्रह छापून घेवून त्याच्या प्रती वितरित केल्या. या संग्रहातील कविता व लेखन हे दलाई लामा यांच्यापासून संजीवनी बोकील यांच्यासारख्या बऱ्याच जणांनी केले होते. प्रवरा गॅझेटिअरच्या सुध्दा अनेक प्रती त्यांनी विकत घेवून विविध मान्वरांच्या कार्यक्रमांना आपण हजर राहिले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असे. श्री. माधवराव चितळे, व विशेषत: डॉ. रा.श्री. मोरवंचीकर त्यांनी गुरूस्थानी होते. वयाचा विचार केला, तर समवयस्क असलेली ही माणसे, पण यांच्यापासून कामाची प्रेरणमी मिळते, त्यामुळे त्यांच्या नित्य सहवासात राहावे अशी त्यांची भावना होती. डॉ. मोरवंचीकरांनी लिहिलेल्या समाधीतील स्पंदने या पुस्ताकाचा विशेष प्रकाशन सोहळा त्यांनी आळंदी येथे घडवून आणला. ही घटना सुमारे दीडदोन महिन्यांपूर्वीची. यावेळी श्री. विश्वनाथ कराड यांना बरोबर घेतले व हजारोंच्या समुदायासमोर हा कार्यक्रम घडवून आणला. डॉ. रा श्री. मोरवंचीकर यांनी क्षेत्रसंन्यास घेतला असल्याने ते औरंगाबाद शहराबाहेर पडत नाहीत. प्रकृती अस्वस्थ्याचे निमित्त असले तरी त्यांच्यावरील श्रध्देपोटी त्यांचे भीष्महृदय हे पुस्तक किंवा अशीच अन्य पुस्तके शरद मांडे यांनीच प्रकाशित केले. मात्र डॉ. मोरवंचीकर त्यासाठी कधीच उपस्थित नव्हते. असा मित्र एखाद्याला लाभणे ही भाग्याचीच गोष्ट म्हणायला हवी. मांडे यांनी थोडी विश्रांती घ्यावी असे आम्हाला वाटत असले तरी त्यांचा तो स्वभाव नव्हता. बऱ्हाणपूर येथील सौ. कुवेकी नहर हा भूमी अंतर्गत असलेला जलसाठा व त्याचा केलेला उपयोग, १७ व्या शतकात निर्माण केलेली व्यवस्था हे सगळे खऱ्या अर्थाने समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी ते आम्हाला बऱ्हाणपूर येथे घेवून गेले, तत्संबंधी एक उत्कृष्ट पुस्तक प्रकाशित केले व आंतरराष्ट्रीय परिषदांतून तो विषय लावून धरला. त्यांचे मित्र दहसहस्र असोत, शरद देशपांडे असोत किंवा जलसंवाद चे देशकर असोत, वेगवेगळ्या क्षेत्रातील चांगली माणसे शोधून त्यांच्याशी संवाद साधावा, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असा ध्यास त्यांना नेहमीच लागलेला असे. गेल्या दोनेक वर्षात ते स्वत: लिहायला लागले होते. जलसंवाद हे मासिक, दैनिक पुण्यनगरी यांतून नियमितपणे त्यांचे लिखाण प्रकाशित होत असे. डॉ. मोरवंचीकरांच्या विविध ग्रंथांच्या प्रस्तावनांचा संग्रह संपादित करण्याचे काम ते करत होते. खडकवासला येथील जलव्यवस्थापन अकादमी, संगमनेर येथील नगरपरिषदेची पाणीपुरवठा व्यवस्था या व अशा अनेक प्रकल्पांच्या संदर्भात सल्लागार म्हणून व या योजना प्रयत्क्ष कार्यवाहीत आणण्यासाठी ते झटत होते. अनेक योजना त्यांनी यशस्वीपणे राबवल्या. पण अजूनही अनेक कामे करण्याचे त्यांच्या मनात होते. तरूणांना लाजवेल असा उत्साह अंगी असलेल्या मांडे यांनी आपल्या जगातून घेतलेली एक्झिट वयोमानानुसार अगदीच अवेळी नसली तरी त्यांचे जाणे अनपेक्षितच होते असे म्हणावे लागेल. एकूणात, त्यांचे व्यक्तिमत्व हे मनात घर करणारेच होते. त्यांच्या आत्यंतिक व्यवस्थेत मांडे वहिनी देखील तितक्याच मनापासून साथ देत असत. मांडे यांच्या घराला भेट दिली की, त्यांनी जाणीवपूर्वक जमवलेल्या वस्तू, त्यांची केलेली विशेष मांडणी आणि एकूणच वास्तू म्हणून त्यांचा बंगला, त्याचे वेगळेपण मनावर छाप टाकत असे. असे हे आमचे शरद मांडे ! आज आमच्या आठवणीतले मांडे म्हणून त्यांच्याबद्दल विचार करणे कठीण झाले आहे. त्यांच्यासारखा कार्यकर्ता पुनश्च होणे नाही.

# नॉलेज पार्टनर - शरद मांडे

**डॉ मंगेश कश्यप**

**मो : ९६३७९२१६११**



कधीतरी २००४/२००५ च्या दरम्यान माझी व शरद मांडे यांच्याशी माझे मित्र कै संदीप जोशी यांनी ओळख करून दिली. आणि त्या दिवसापासून म्हणजे ते जाण्यापूर्वी पर्यंत ते सतत संपर्कात असायचे. जल क्षेत्रामध्ये काही नवीन घडलं. नवीन तंत्रज्ञान आलं. किंवा सरकारच्या पॉलिसीज मध्ये काही बदल झाले. धोरणांमध्ये काही विषमता आढळली. तर त्यांचं लक्ष या गोष्टींकडे लगेच जायचं आणि मग त्यांची या क्षेत्राशी संबंधित असलेल्या लोकांशी एक संवाद यात्रा सुरु व्हायची. अत्यंत अभ्यासू आणि अभ्यासाचं कृतिशीलते मध्ये रूपांतर करण्याचं कौशल्य असलेले जे काही थोडेफार सामाजिक जलक्षेत्रातील मंडळी आहेत त्यांच्यापैकी शरद मांडे हे एक होते. माझा विषय हा तसा थोडासा आऊट ऑफ बॉक्स असा असल्यामुळे त्यांना इकॉलॉजिकल इकॉनॉमिक्स आणि वॉटर गव्हर्नन्स अँड इकॉनॉमिक्स या विषयांबद्दल विशेष कुतूहल होते आणि त्या कुतूहलापोटी ते अनेक प्रश्न मला विचारून त्यांचं शंका समाधान करून घेत असत. २०१८ मध्ये मी डेन्मार्क युनिव्हर्सिटीतून इकोसिस्टीम evaluation या विषयात एक कोर्स केला. त्यांना समजल्यावर त्यांनी लगेच फोन करून मला त्याचा सिलॅबस पाठव अशी अज्ञाच केली. आणि त्यातील काही बाबी माझ्या कडून जाणून घेतल्या. त्यांच्यातील जीवनाच्या शाळेतील विद्यार्थी त्यांनी शेवट पर्यंत जागा ठेवला. मला आठवतंय त्यानुसार कधीतरी २००८/९ च्या दरम्यान आमच्याकडे रिझर्व बँकेचे एक डेप्युटी गव्हर्नर यायचे होते आणि मांड्यांना हे समजलं तेव्हा ते सुद्धा संदीप जोशींना घेऊन माझ्याकडे आले आणि पाण्याचे अर्थशास्त्र किंवा पारिस्थितिकी अर्थशास्त्र या गोष्टीकडे आरबीआय कोणत्या दृष्टीने पाहते. त्याचे प्रतिबिंब आरबीआयच्या ध्येयधोरणात उमटतात काय. असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आणि समाधानाने नुसते धन्यवाद न बोलता त्यांनी आपल्याबरोबर आणलेला खाऊही सर्वांना वाटला. म्हणजे त्यांच्यातील ज्ञानलालसा आणि व्यक्तीलालसा या दोन गुणांनी त्यांनी स्वतःला दीक्षित करून घेतले होते. माणूस छोटा असो अथवा मोठा ते स्वतःहून त्याच्याशी कनेक्ट होत. आपलं काम असेल तर समोरचा माणूस आपल्यापेक्षा लहान आहे की मोठा आहे हे पाहण्याची काहीच आवश्यकता नाही. आपल्या कामातून आपल्या आजूबाजूच्या समाजाला काही शाश्वत मूल्य देता आली तरच आपलं काम समाजाला रुचतं अशी त्यांची मनस्वी धारणा होती. अगदी अलीकडचे उदाहरण सांगायचं म्हणजे दैनिक पुण्यनगरीमध्ये त्यांचं पाण्याविषयीचं सदर चालू होतं. आणि त्या संदर्भातला कुठलाही एखादा लेख लिहून झाला की ते सकाळी सकाळी फोन करून वाचून दाखवायचे. आणि मग विचारायचे हे बरोबर आहे ना? खरं तर माझ्यासारख्या अतिसामान्य माणसाला एवढा मोठा माणूस असा विचारतोय हे पाहून फार संकोच वाटायचा परंतु असे विचारण्यामागे त्यांचा एक निरागसपणा होता. सर्वांना बरोबर घेऊन जायचं. आपल्या ज्ञानामध्ये अधिक भर घालायची. आपल्या ज्ञानाच्या आणि कार्याच्या कक्षा कशा रुंदावता येतील याविषयी सतत विषय तज्ञांची चर्चा करून उपक्रम राबवायचे हे त्यांच्या बहुतेक जेनेटिक्समध्येच होते. आणखी एक उदाहरण द्यायचं म्हणजे त्यांनी अलीकडेच तत्कालीन शासनाच्या काही अधिकाऱ्यांशी बोलून शेतकरी कृषी जलसंवाद यात्रा या उपक्रमाचे आयोजन केलं होतं आणि त्याला तत्कालीन राज्यकर्त्यांनी उत्तम प्रतिसादही दिला होता. त्या संदर्भातील पत्र व्यवहार त्यांनी व्हॉट्सप वर मला पाठवला होता.त्या यात्रेच स्वरूप कसे असावे या विषयी जुजबी चर्चाही झाली होती परंतु नंतर काही कारणांमुळे हा उपक्रम आकारास येऊ शकला नाही. सरकार बदलले तरी सुद्धा ते या उपक्रमा बद्दल खूप अशावादी होते. समाजामध्ये जेंव्हा एक वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घुसळण होत असते अशा काळात मांड्यांसारख्या माणसांचं असणं हे फार महत्त्वाचं होतं. आणि नेमकं आपल्या समाजाच्या राज्याच्या देशाच्या संक्रमण काळात मांडे यांनी आपली इहलोक यात्रा संपवली. देशातील व विदेशातील अनेक विविध क्षेत्रातील तज्ञांशी त्यांचे असलेले सलोख्याचे संबंध आणि त्यामुळे त्यांना मिळालेली ज्ञानश्रीमंती आणि जनश्रीमंती ही त्यांची व्यक्तिगत कमाई होती. मांड्यांचा फोन म्हणजे किमान तीस चाळीस मिनिटांची ज्ञानयात्राच. त्यामुळे बऱ्याचदा मी त्यांना सांगायचो की लंच अवर झाले की मी तुम्हाला फोन करतो आणि तसा आमचा फोन व्हायचा. तेवढ्या काळात ते नुसतेच आपल्या आजूबाजूला नाही तर राज्यात काय चाललंय देशात काय चाललंय आणि जगात काय चाललंय याचा धावता आढावा देत असत. असे हे माझे सीनियर नॉलेज पार्टनर किंवा माझ्यासाठी असलेला शरद मांडे नावाचा ज्ञानाचा झरा त्यांच्या जाण्यामुळे अटला. ईश्वर त्यांना सद्गती देवो अशी आमच्या सिरम पर्यावरणीय शाश्वत संशोधन संस्थेच्या वतीने प्रार्थना..

*****



# भरभरून व्यक्त होणारा जल-अभ्यासक - शरद मांडे

श्री. प्रदीप पुरंदरे

मो : ९८२२५६५२३२



शरद मांडे हे स्वत:च एक संस्था होते ! सदा बुध्दीला ज्ञानयोगीच ठेवा हे तत्व त्यांनी शेवटपर्यंत पाळले. कौतुक करताना मोकाट सिंचन आणि नाराजी व्यक्त करताना कधी सर्ज इरिगेशन तर कधी ठिबक ही त्यांची पध्दत अनुकरणीय होती.

शिरपूर पॅटर्नचे प्रणेते श्री. खानापूरकर यांनी शरद मांडे यांच्या निधनाची अनपेक्षित व चटका लावून जाणारी बातमी फोनवर सांगितली. मांडे नुकतेच घरी येवून गेले होते. श्री दहासहस्र यांच्याबरोबर चाललेल्या त्यांच्या कामाबाबत ते भरभरून बोलत होते. माझ्या नवीन पुस्काचे कौतुक करताना त्यांनी पुस्तकाचा आशय व मुखपृष्ठ यांचा मेळ लागत नाही आणि फोटो व आलेख रंगीत असायला हवे होते अशा दोन कॉमेंटसही केल्या. पुस्तकाचे परखड परिक्षण करा अशी विनंती केल्यावर मात्र त्यांनी हसून विषय बदलला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून सेवानिवृत्त व्हायला बराच उशीर असताना मांडेंनी नोकरी सोडली आणि स्वत:ची Consultancy Firm सुरू केली. ते एक यशस्वी व सचोटीचे अभियंता होते. इंडियन आणि अमेरिकन वॉटर वर्क्स असोशिएशन या दोन्ही संस्थांचे क्रियाशील पदाधिकारी म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. सेवानिवृत्तीनंतर आपापल्या क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहण्याची आणि त्यात महत्वपूर्ण योगदान देण्याची महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांची थोर परंपरा श्री. शरद मांडे यांनी अत्यंत सक्षमपणे पुढे नेली. सदा बुध्दीला ज्ञानयोगीच ठेवा हे तत्व त्यांनी शेवटपर्यंत पाळले. त्यांचे संस्थात्मक जीवन अतिशय समृध्द होते. खरे तर शरद मांडे हे स्वत:च एक संस्था होते ! AWWA India च्या हैद्राबादला झालेल्या दुसऱ्या अंतरराष्ट्रीय परिषदेत (१६-१७ नोव्हेंबर २०१८) त्यांच्या आग्रहामुळे मी उपस्थित राहिलो होतो आणि एक लेख ही सादर केला होता.

पाण्या तुझा रंग कसा ? (लेखक - श्री. विद्यानंद रानडे) आणि आठवणीतला सुवर्णकाळ..... महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा ( लेखक - श्री.अशोक अळवणी) या दोन पुस्तकांबाबत त्यांच्या बरोबर झालेल्या सविस्तर व सकस चर्चेमुळे अनेक नवीन पैलू माझ्या लक्षात आले. पुण्यनगरीत ते लिहित असलेल्या लेखमालेतील प्रत्येक लेख ते मला न चुकता पाठवायचे.

सुप्रसिध्द जल-इतिहासकार श्री. मोरवंचीकर यांना भेटायला औरंगाबादला आले की, मांडे बहुतेक वेळा माझ्याही घरी यायचे. त्यांचे वाचन चौफेर परंतु अभिरूचीसंपन्न होते. महाराष्ट्रातील पाणी प्रश्नाचा त्यांचा अभ्यास सखोल व समग्र होता. जलक्षेत्रातील आजी माजी उच्चपदस्थांबरोबर त्यांचे खूप निकटचे संबंध होते. खडकवासला प्रकल्पातील गाळ काढण्याच्या कॅप्टन पाटील यांच्या उपक्रमात त्यांचा सहभाग महत्वपूर्ण होता.

समाज माध्यमातील परिभाषा वापरायची झाल्यास मांडे मला फॉलो करायचे. माझा लेख प्रसिध्द झाला की सर्वात पहिल्यांदा त्यांचा फोन यायचा. त्यांनी तो बारकाईने वाचलेला असायचा. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रियाही मार्मिक असायच्या. पाण्याशप्पथ ची प्रत मी त्यांना भेट दिल्यावर साधारण महिन्याभरात त्यांनी मला दहा पानी पत्र पाठवून पाण्याशप्पथ बद्दल त्यांची मतेही कळवली होती. कौतुक करताना मोकाट सिंचन आणि नाराजी व्यक्त कराताना कधी सर्ज इरिगेशन तर कधी ठिबक ही त्यांची पध्दत अनुकरणीय होती. मतभिन्नता असली तरी सौहार्दपूर्ण संवाद कायम ठेवायचा हे तत्व त्यांनी नेहेमी आचरणात आणले.

शरद मांडे यांच्या निधनामुळे जलक्षेत्रातील एक अफाट लोक संग्रह असणारा, सर्वत्र कायम संचार करणारा आणि भरभरून व्यक्त होणारा मान्यवर अभ्यासक आपण गमावला. ते हयात असताना खरे तर त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथायोग्य सत्कार व्हायला हवा होता. पण अति परिचयात अवज्ञा होणे आणि समकालीन व्यक्तीचे मोठेपण वेळीच ओळखले न जाणे हा प्रकार त्यांच्या बाबतीतही झाला. त्यांना आंदरांजली वाहतांना म्हणूनच मी तीन सूचना करू इच्छितो. त्याबद्दल कृपया विचार व्हावा.

१. श्री. मांडेंचे प्रकाशित व अप्रकाशित पाणी आणि सिंचन विषयक लिखाण पुस्तक रूपाने प्रकाशित करावे. त्यात खालील बाबींचा समावेश व्हावा.

- जलक्षेत्रातील विविध संस्थांमधील त्यांचा सहभाग (उदा - IWWA, AWWA, Upper Bhima Partnership)
- विविध संस्थांना त्यांनी केलेले मार्गदर्शन (उदा - महाराष्ट्र विकास केंद्र)
- जलक्षेत्रातील दिग्गजांबरोबर त्यांचा झालेला संवाद (उदा - सर्वश्री माधवराव चितळे, मोरवंचीकर, धाराशिवकर, दहासहस्र, रानडे, मोरे, दत्ताप्रसाद दाभोळकर, अशोक अळवणी, खानापूरकर, दत्ता देशकर इत्यादी)

२. शरद मांडे यांच्या स्मृती निमित्त दरवर्षी वृत्तपत्रीय लेखांव्यतिरिक्त पाणी -विषयक सर्वोत्तम शोधलेखाकरिता (Popular Article नव्हे ! ) पुरस्कार देण्यात यावा.

३. पाणी व सिंचन विषयक अनेक महत्वाच्या दुर्मिळ संदर्भ साहित्याचा मांडे यांनी केलेला बहुमोल संग्रह अभ्यासकांना उपलब्ध व्हावा.

# पाण्याच्या विश्वात रममाण होणारे शरद मांडे


## डॉ. सुरेश कुळकर्णी

**मो : ९८२०१५८५५३**


श्री शरद मांडे यांच्या निधनाची दुःखद बातमी मला फेसबुकच्या माध्यमातून समजली परंतु त्यावर माझा विश्वासच बसेना कारण गेल्याच महिन्यात (जुलै) आम्ही एकमेकांशी फोन वर बोललेलो होतो व त्यांची प्रकृतीही चांगली होती. आपण सारे एका न संपणाऱ्या अदृश्य रांगेत चालत असतो, आपला बाजूला होण्याचा नंबर केंव्हा ही नियतिच ठरवते. श्री मांडे, पुण्यनगरी या वृत्तपत्रातून आपलं पाणी या सदराखाली याच वर्षाच्या एक जानेवारी पासून दर पंधरा दिवसानी पाण्याच्या विविध मुद्द्यावर ते लिहित होते. प्रकाशित झालेल्या सर्व लेखांचे स्कॅन करून इतरांबरोबर मला पण नियमितपणे पाठवायचे. त्यांचा जुलै २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखावर आमची बराच वेळ चर्चाही झाली होती. परंतु तोच लेख त्यांचे शेवटचे लिखाण झाले. सर्वसामान्यपणे, श्री मांडे महिन्यातून किमान एकदा तरी फोन करत व त्यांचा फोन आल्यावर प्रथम मागच्या पंधरवड्यात पाण्याच्या विश्वात काय-काय घडलं, जल क्षेत्रातील कोणाच्या व्यक्तींच्या गाठी-भेटी घेतल्या, कुठल्या कार्यक्रमास उपस्थिति लावली याची सविस्तर वृतान्त सांगत असत. श्री मांडे यांचा केवळ राज्यातीलच नव्हे तर इतर राज्यांतील व देश विदेशातील पाण्या संबंधित काम करणाऱ्या अनेक लहाना पासून मोठ्या अभ्यासकांशी, तज्ञासोबत सौहार्द्रपूर्ण संबंध होते. देश-विदेशातील अनेक आंतरराष्ट्रीय पाणी विषयक संस्थांची त्यांचा संबंध होता. आपल्या विनम्र व मदतीसाठी सदैव उत्सुक स्वभावामुळे संपर्कात येणाऱ्या व्यक्तीस ते अल्प काळातच मित्र बनवत असत. देश-विदेशात भ्रमंती करून पाणी व्यवस्थापन विषयी नव नवीन माहिती मिळवण्याचा श्री शरद मांडे यांचा मोठा व्यासंग होता. दर तीन वर्षानी अयोजित केल्या जाणाऱ्या जगातीक जल मंचांच्या (वर्ल्ड वॉटर फोरम ) कार्यक्रमात ते आवर्जून हजेरी लावत.

श्री मांडे यांची व माझी ओळख वीस वर्षापूर्वी प्रथम दिल्लीस्थित 'आंतरराष्ट्रीय सिंचन व जल निस्सारन आयोगाच्या' मध्यवर्ती कार्यालयात (आय. सी. आय. डी.) कार्यरत असताना झाली होती. श्री मांडे जेव्हा-जेव्हा दिल्लीस येत तेव्हा ते आवर्जून आयोगात येऊन मा. डॉ. सी. डी. थत्ते, महासचिव यांची भेट घ्यायचे व नंतर माझ्याशी अनेक विषयावर गप्पा करत. आय. सी. आय. डीचे कांही नवीन प्रकाशन असल्यास ते विकत घेत असत. पुढे, २०१४ मध्ये मी मुंबई येथील महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या सेवेत असताना त्यांच्याशी संवाद वाढत गेला व नंतर पुण्याला आल्यानंतर भेटीगाठी व विचाराची देवाण- घेवाण वृद्धिंगत होत गेली. श्री अनिल पाटील यांनी श्री विद्यानंद रानडे यांनी लिहिलेल्या पाण्या तुझ्या रंग कसा या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रम अयोजित केला होता. त्याच वेळी श्री मांडे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त मा.श्री रामराजे नाईक निंबाळकर यांच्या हस्ते व मा. डॉ. सी. डी. थत्ते व श्री रानडे व यांच्या उपस्थितित त्यांचा सत्कार करण्यात आला व त्या प्रसंगी उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले होते. श्री मांडे जरी इंडियन वॉटर वर्कस असोसिएशन या संस्थेत सक्रिय होते तरी पण त्यांना जल क्षेत्राशी निगडीत इतर विषयातही खूप रुचि होती.

श्री मांडे यांना पुस्तकांचा संग्रह करण्याचा मोठा व्यासंग होता. एकदा काही कामानिमित्त त्यांच्या निवास स्थानी जाण्याचा योग आला. त्यावेळी त्यांचे भव्य अभ्यास कक्ष पाहण्यात आले. त्यांच्या कडे पाणीविषयक देशी-विदेशी, मराठी व इंग्रजी भाषेतील असंख्य पुस्तकांचा व अहवालांचा संग्रह तसेच विविध वर्तमानपत्रांतील कात्रणाची गटठे पाहून थक्क झालो. कोणते पाणी विषयक नवीन पुस्तक बाजारात आले की श्री मांडे ते लगेचच विकत घेणार व ते पुस्तक वाचून त्यातील प्रमुख मुद्द्यावर इतरांशी चर्चा करत असत. त्यांच्या घरी गेल्यानंतर अतिशय आग्रहाने ते पाहुणचार करत व मन मोकळेपणाने गप्पा करत. श्री मांडे एक उत्तम संयोजक होते. अनेक जल अभ्यासकांना पाण्याविषयी कांही ना काही तरी लिहिण्यास ते प्रोत्साहन देत असत. डॉ. दहासहस्त्र, पाणीपुरवठा विभागातील माजी सदस्य सचिव व इतर कांही अभियंत्यांना प्रोत्साहन देऊन 'इंटिग्रेटेड वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट' ह्या एक नाविन्यपूर्ण ग्रंथाची निर्मिती करण्यासाठी श्री मांडे यानीच पुढाकार घेतला होता. सदर ग्रंथ लवकरच प्रकाशित होणार असल्याचे कळते. श्री मांडे यांचा स्वभाव अत्यंत विनम्र व प्रेमळ असल्यामुळे त्यांचा मोठा मित्र परिवार आहे. वयाची ८० वर्ष पूर्ण झाली असतानाही त्यांचा कामाचा उरक, फिरण्याचा/ प्रवासाचा उत्साह व अभ्यासू व्रती तरुणांना लाजवेल आसीच होती. श्री शरद मांडे यांनी आपलं सार आयुष्य पाण्याच्या विश्वात झोकून दिल होत, समाजासाठी त्यांनी अनेक तांत्रिक कामे प्रामाणिकपणाने व समर्पणाने केली. त्यांच्या या यशस्वी व्यावसायिक व सामाजिक कारकिर्दीचा आदर्श समोर ठेवून आपण सर्व जल अभ्यासकांनी विशेषतः तरुण व्यावसायिकानी त्यांचे योगदान द्यावे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

*****

# जलदुवा निखळला

**डॉ. प्रवीण महाजन**

**मो : ९८२२३८०१११**



शरदराव मांडेची निधन बातमी समजली, आणि मोठा जल कालखंड डोळ्यासमोर उभा राहिला. त्यांनी केलेले जल कार्य, वेळोवेळी त्यांचे होत असलेले मार्गदर्शन आणि शरद रावांच्या शिल्लक राहिलेल्या इच्छा या सर्व डोळ्यासमोर परत परत येत राहिल्या. समाजासाठी, समाज भावनेच्या विचारसरणीशी, जल कार्यासाठी भारावलेला, जुन्या नवीन पिढीचा मार्गदर्शक. तो हसरा चेहरा, नाही कोणाला दुःखवले, मनाचा तो भोळेपणा, कधी नाही केला मोठेपणा, उडुनी गेला अचानक प्राण, पुनर्जन्म घ्यावा शरदराव हीच इच्छा.

पाच – सहा दशके महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जल नियोजना बाबतीत आदरणीय शरदराव मांडे साहेबांचे योगदान महत्वाचे राहिलेले आहे. जलक्षेत्रात या जलतज्ज्ञाला त्यांच्या ८० व्या वर्षात सुद्धा तरुण तुर्क म्हणून पदवी द्यावी असेच त्यांचे जल कार्य होतं.



माझा परिचय शरदरांशी तसा फार जुना नव्हता. जलसंवादचे संपादक मा. दत्ताजी देशकर यांच्या माध्यमातून शरदरावाशी माझी ओळख झाली. २०१६ च्या सुरुवातीला पुण्यातील एका बैठकीत माझी आणि त्यांची प्रत्यक्ष ओळख झाली. बैठकीचा विषय त्यांच्या आणि माझ्या आवडीचा होता. जल मागोवा महाराष्ट्राचा या ग्रंथासाठी आम्ही सोबत आलो होतो. शरदरावांच्या पहिल्याच बैठकीत त्यांच्या चुणचुणीत स्वभावाची, स्पष्टेवक्तापणाची, कामाच्या गतीची जाणीव झाली. त्याचवेळी चालते बोलते जलतज्ज्ञ म्हणून शरदराव हे मनामध्ये कोरले गेले. त्यांच्या कामाची पद्धत अत्यंत जवळून पाहण्याची संधी त्यानंतर मला अनेक वेळा मिळाली.

जल मागोवा बैठकी नंतर त्या बैठकीचे कार्यवृत्त जेव्हा आले, तेव्हा जे काही ठरलं होतं, तसच्या तसं तीन पानाचे ते मार्गदर्शन असलेले कार्यवृत्त वाचत असताना या जलतज्ञ माणसाच्या बाबतीत माझ्या मनात त्यांच्या कार्याचा आलेख कायम प्रिन्ट झाला. जलकार्यातील शरदराव, वडिलधारी शरदराव, पारीवारीक शरदराव, लेखक शरदराव कायमच मनामध्ये बसलेत. पुढे पुढे हळूहळू अनेक वेळा फोनवर बोलणे होत असे. तासनतास मोबाईलवरचे त्यांचे मार्गदर्शन, विचारपूस, प्रकल्पनिहाय चर्चा, उदाहरणसह विश्लेषण यातून त्याच्या कामाची तगमग समजायची.

सरांसोबत झालेल्या बैठका, भेटी. यासर्वा मध्ये पुढील काळात काय काय करायचे हा त्यांचा प्लॅन ते सांगत राहिले, पण त्यांचे मनातील कार्य जनात यायचे अगोदरच काळाने त्याचेवर घाव घातला, असे असले तरी त्यांच्या ह्यातीतील त्यांचे जलविचार, त्यातील सकारात्मकता, लोकांच्या मनावर कोरून निघून गेले, शरदरावाना जल इतिहासात स्थान मिळेल. त्यांची आठवण केल्या जाईल. मरावे परी कीर्ती रुपी उरावे असेच व्यक्तीमत्वाचे धनी असलेले शरदराव आज जलरूपी कार्याने अमर झाले, असेच म्हणावे लागेल.

एकदा मोबाईलवर बोलता बोलता मी ५ तारखेला मुंबईला आहे हे सांगताच ते भेटायला मला मुबंईला आहे. जवळपास ३ घंटे आम्ही सोबत होतो, त्यावेळी विषय होता त्यानी लिहिलल्या लेखाचे एकत्रीकरण करणे, पण त्याचे व्यस्ततेमुळे ते झाले नाही. पुढे कोवीड महामारीमुळे झाले नाही. यापुढे त्यांचे जलकार्य पुढे नेण्याची जबाबदारी ही आपली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात अभियंता म्हणून काम केलेले शरदराव मांडे यांनी स्वेच्छा निवृत्ती घेऊन पाणीपुरवठा व जलनिस्सारण या क्षेत्रात शेवटचा श्वास असेपर्यंत तांत्रिक सल्लागार म्हणून सेवा केली.. त्यांनी अनेक वर्तमानपत्रातून अनेक वेळा लेख लिहिले. त्यात पाण्याची विश्व विश्वातील पाणी, समन्वयी पाणी, आपलं पाणी, कुतुहलाचे पाणी, शाश्वत विकासासाठी पाण्याची शाश्वती, महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया होईल, पण कसा, भारतीय जलसंस्कृती, धरण सुरक्षितता व आपुली व्यवस्थापन, कृषी जलसंवाद यात्रा, जलाशय संवर्धन, खडकवासला पुनर्जीवन, बुऱ्हाणपूर आश्चर्यकारक, मध्ययुगीन जलव्यवस्थापन यासोबतच त्यांनी अनेक लेख लिहिलेत. जलसंवाद, जल उपासना या मासिकात सुद्धा नित्यनेमाने त्यांची लेख वेगवेगळ्या विषयावर असायचे.

राज्यातील आणि देशातील जल चळवळीला त्यांच्या रुपाने एक दमदार नेतृत्व लाभले होते. अधिकारी जीवनातील महत्वाची पदे भूषविलेल्या व्यक्तीने आयुष्याच्या अखेरीस एखादा विषय हाती घेऊन विशेष योगदान कसे देता येईल याचे आदर्श उदाहरण त्यांनी आपल्यापुढे ठेवले आहे. पाण्याच्या बाबतीतील हा चालता बोलता खजिना संदर्भ ग्रंथ होता असेच म्हणावे लागेल.

शरदरावाची ज्योत अनंतात विलीन झाली, आपल्या स्मृती आठवणीतून दाटून आल्यात. भाव सुमनांची ओंजळ भरुनी, वाहतो महाजन परीवारा कडून श्रद्धांजली..!

# श्री शरद मांडे यांना आदरांजली

**श्री. सुरेश खानापूरकर, मो : ९८२२३६३६३९**



२१ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी मला जलसंवाद मासिकाचे संपादक श्री दत्ताजी देशकर यांचा फोन आला त्यात त्यांनी सांगितले की माननीय शरदराव मांडे यांना अर्धांगवायचा झटका आला. लगेच दोन-तीन तासाने त्यांचा पुन्हा फोन आला की श्री मांडे यांनी इह लोकीची यात्रा संपवली. बातमी ऐकून धक्काच बसला.

कैलास वासी मांडे यांचा माझा फार जुना संबंध होता. पुण्याला मागे त्यांनी एमआयटी कॉलेजमध्ये एक पाणी परिषद घेतली होती त्यात त्यांनी माझे भाषण ठेवले होते. तीच माझी पहिली ओळख. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील पाण्याबाबत केलेल्या कामासंबंधी ते भाषण होते. शिरपूर पॅटर्न म्हणून ते प्रसिद्ध होते. ते भाषण ऐकून लगेचच काही दिवसात ते प्रत्यक्ष शिरपूरला काम पाहण्यासाठी आले. त्यांना ते काम फार आवडले. त्यानंतर ते बरेच वेळा शिरपूरला आले. किंवा त्यांचा फोन आला तर ते शिरपूर पॅटर्नवर भरभरून बोलत असत. या सर्व कामाबद्दल ते मला वेळोवेळी मार्गदर्शन करीत असत आणि माझा उत्साह वाढवीत असत. शासनाने हे काम का अंगीकार ले नाही याबाबत ते नेहमी खंत व्यक्त करीत असत.

ते कुशल इंजिनियर होते. मांडे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून सेवानिवृत्त झालेले एक यशस्वी सचोटीचे अभियंता होते. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशनचे क्रियाशील पदाधिकारी म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले.

छत्तीसगड मधील रायपूर येथे इंडियन वॉटर वर्क्स च्या अधिवेशनाच्या स्मरणिकेमध्ये पाण्याबाबत मी काही लिहावे याबाबत ते आग्रही होते. त्याप्रमाणे मी एक लेख दिला होता. नुसता छापूनच नाही आला तर मला त्या लेखाबद्दल इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन ने एक पुरस्कार दिला होता. तो घेण्यासाठी मी स्वतः तेथे यावे असा मांडे यांचा आग्रह होता आणि मी त्याप्रमाणे रायपूरला गेलो होतो. माझ्यावर त्यांनी प्रचंड प्रेम केले. ते फोनवर माझ्याशी कमीत कमी अर्धा तास बोलायचे त्यात पाणी हा विषयच असायचा हे सांगणे न लगे.

पुण्यनगरी त ते लिहीत असलेल्या लेखमालेतील प्रत्येक लेख त्यांनी मला न चुकता पाठवला आहे. पाण्याबाबत कोणी काही लिहिले किंवा शिरपूर पॅटर्न बद्दल कोणी चांगले किंवा वांगले दिले तरी त्याबाबत ते माझ्याशी बराच वेळ बोलत असत. दुष्काळावर महापुरावर शिरपूर पॅटर्न हे कायमचे उत्तर आहे यावर त्यांचा भरवसा होता.

शरद मांडे यांच्या निधनामुळे जलक्षेत्रातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपलेले आहे. त्याचप्रमाणे माझे एक मार्गदर्शक गुरु यांना मी मुकलो आहे.

**त्यांना आदरांजली.**

# श्री शरद मांडे - एक प्रेरणास्थान

**डॉ. संजय दहासहस्र**

**मो : ९९८७०३००८०**



श्री शरद मांडे यांचा माझा संबंध १९९५ पासून आला. ते माझ्या ऑफिस (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) मध्ये कार्यरत होते. त्या वेळी सोलापूर शहराच्या पाणी पुरवठा योजनेचे काम चालू होते. सोलापूरला उजनी धरणातून १०० किलोमीटर एवढ्या लांबीची प्रिस्ट्रेस कॉंक्रिट पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु होते. अश्या प्रकारची मोठ्या व्यासाची व खूप लांबीची पाइप लाईन प्रथमच टाकल्या जाणार होती. श्री मांडे यांनी त्या पाइपलाईनचे डिझाइन तपासून योग्य असे टेंडर पेपर्स तयार केले. त्यामुळे ही योजना यशस्वीरीत्या पूर्ण झाली. श्री मांडे तेवढ्यावर थांबले नाही, त्यांनी या पाइपलाइनचे डिटेल्स 'डेटा बुक' मध्ये टाकून सर्व महाराष्ट्रा मध्ये सर्वांना उपलब्ध करून दिले.

श्री मांडे यांचे उल्लेखनीय काम म्हणजे पाणी पुरवठा क्षेत्रासाठी डेटा बुक तयार करणे होय. त्यांनी पाणी पुरवठा क्षेत्रामधील सर्व डिझाइन नॉर्म एकत्रित केले. त्याचा सर्व इंजिनिअर्स ला लाभ झाला. या डेटा बुक ची आता पर्यंत सहा एडिशन्स हातोहात खपल्यात.

श्री शरद मांडे हे 'इंडियन वॉटर वर्क्स' च्या पुणे शाखेचे सेक्रेटरी सुमारे १९ वर्ष होते. तसेच ते इंडियन वॉटर वर्क्स चे ऑल इंडिया ऑनररी सेक्रेटरी होते. त्यांनी मुंबई येथे मुख्यालयाच्या बिल्डिंग मध्ये एक मजला चढवला. त्यांनी अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन शी इंडियन वॉटर वर्क्स ची चजण करून मोट बांधली. त्यामुळे प्रगत

देशातील technology भारता मध्ये येण्यास मदत झाली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्या बद्दल त्यांना जानेवारी २०२२ रोजी इंडियन वॉटर वर्क्स च्या वार्षिक सभेमध्ये गौरवांकित केले गेले.

श्री शरद मांडे यांचे प्रवरा ग्याझेट तयार करण्यामध्ये खूप योगदान होते. नुकतेच त्यांनी भीमा ग्याझेट तयार करण्यासाठी मोठे काम केले आहे. त्यांनी पुणे शहरासाठी एक सर्वांगीण माष्टर प्लॅन करावयाचे योजिले होते. त्यासाठी त्यांनी MIT, Pune ला संपूर्ण जिल्ह्यामधील वॉटर शेड्स तयार करुन दिले होते.

नॅशनल वॉटर policy ने तथा महाराष्ट्र वॉटर policy ने राज्याच्या विकासासाठी नद्यांचे बेसिन/ उप बेसीन हे एकक विचारात घ्यावे असे प्रतिपादन केले आहे. पाणी क्षेत्रातील नामवंत माननीय चितळे यांनी सुद्धा या बाबत ही बाब मांडली आहे. श्री शरद मांडे यांनी हा धागा पकडून गेल्या १० वर्षांपासून 'इंटिग्रेटेड वॉटर रिसोर्स मॅनेजमेंट' चे काम त्यांच्या इतर चार सहकाऱ्यां समवेत काम सुरु केले होते. ते काम लवकरच पूर्णत्वास जात आहे.

श्री शरद मांडे हे वारंवार म्हणायचे की पाणी हेच प्रगतीचे साधन आहे. ते Alleviation of poverty through water याचा नेहमी उल्लेख करावयाचे. त्यांनी पाणी क्षेत्राला पुर्णपणे वाहून घेतले होते. अशा या तपस्वीला ला आम्हा सर्वांची विनम्र श्रद्धांजली.

– डॉ. संजय दहासहस्र, माजी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

*****

# माझे सहकारी - श्री. शरद मांडे

**श्री. अशोक अळवणी**

**मो : ९४०४७२६५६९**

आमच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यांच्या ग्रुपवर वर्षभरापूर्वी, श्री शरद मांडे यांच्यावर स्तुतीसुमने उधळली होती, आणि आता त्याच मांडेंना श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली आहे ! फार वाईट वाटले !

मी आणि कै शरद मांडे, आम्ही जवळपास एकदमच तेव्हाच्या पाटबंधारे विभागांतर्गत पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग यंत्रणेत पुण्यात नोकरी सुरू केली . त्यांच्या व माझ्या जन्मतारखेत फक्त १५ दिवसांचा फरक होता, ते मोठे.

सुरुवातीच्या काळात आमची कामे अन्यत्र, त्यामुळे भेटी अधुनमधून होत असत. १९७१ मध्ये मी उप अभियंता असताना माझी मुंबईला बदली झाली आणि निवृत्ती नंतरच २००१ मध्ये मी पुण्यात परतलो. त्यामुळे दरम्यान, वारंवार भेटी होत नसत. अधूनमधून ते मुंबईला येत असत तेव्हा , बोलणे होई, त्यांची, इतरांची चौकशी होत असे. दरम्यान केव्हातरी त्यांनी ऐच्छिक सेवा निवृत्ती घेतली. स्वतः ची सल्लागार सेवा सुरू केली. त्या काळात, १० व्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात, पाणीपुरवठा व स्वच्छता या विषयावरील अभ्यास गटाच्या कामासाठी ते येत असत, आमची चर्चा होत असे .

मी पुण्यात आल्यावर आमच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. त्यांचे निवासस्थान जवळच होते. या काळात अँबी व्हॅली येथील पाणी पुरवठा योजना आणि अन्य खासगी / सरकारी प्रकल्पात त्यांचा सहभाग होता. यासाठी ते डेक्कन क्वीन गाडीने प्रवास करत आणि त्या प्रवासात असताना त्यांचे फोन येत असत. आपण काय करीत आहोत याची माहिती देत असत आणि मी काय करतो, याची विचारपूस करीत.

या काळात सहकार्यांच्या मदतीने ते इंडियन वॉटर वर्क्स् असोसिएशनच्या पुणे शाखेचे कामकाज पहात होते. केंद्राचे कार्य वाढवले. पुणे केंद्राला प्रतिष्ठा मिळवून दिली. या कामासाठी त्यांनी स्वतः ला वाहुन घेतले होते असे म्हटले तर, ती बिलकुल अतिशयोक्ती होणार नाही. नेहमीच्या बैठकी तर होत होत्याच, पण निरनिराळ्या माननीय व्यक्तींना बोलावून, त्यांची व्याख्याने आयोजित करण्यात त्यांचा हातखंडा होता. अनेक चांगले कार्यक्रम त्यांनी सादर केले.

बैठकीची सूचना पाठवणे, अहवाल, इतिवृत्त पाठवणे, हे किचकट व कंटाळवाणे काम. पण ते वेळेवर करणे, त्यातील सातत्य ही, त्यांची खासियत. आज कोणाला खरे वाटणार नाही, पण यासाठी त्यांना कोणी सहाय्यक नव्हते. ते, पत्रव्यवहार, अहवाल छापून आणायचे, आणि पुढील काम, त्यांच्या पत्नी करीत. कागद पाकिटात घालणे, पत्ते लिहिणे आणि पोस्टाने पाठवणे ! हे कुटुंबच आयवा मय झाले होते !

श्री पाटे यांच्या सारखे खजिनदार व्यवहार सांभाळत, हिशोब ठेवत, ऑडिटर लेखा परीक्षण करीत. पण या काळात, एकाही व्यवहाराविषयी कोणी कधी टीका केली नाही, बोट दाखवले नाही, ही गौरवाची बाब आहे.

मुळात, तेव्हाच्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलनिःसारण मंडळाच्या अभियंत्यांकडून उत्कृष्ट काम झाले पाहिजे, ही त्यांची वाजवी अपेक्षा. पण त्यासाठी त्यांना नीट व्यवस्थित, आणि मुख्य म्हणजे, विश्वसनीय माहिती हवी. ती, त्यांच्या संग्रही हवी. या विचाराने त्यांचा ताबा घेतला आणि जन्म झाला, टेक्निकल डाटा बुक चा ! विविध अधिकारी व्यक्तींना गाठून त्यांना विनंती करुन माहिती जमवली. ती तपासून घेतली आणि अखेरीस एक सुबक, माहितीपूर्ण पुस्तक प्रसिद्ध

झाले. या पुस्तकावर त्यांचा फार जीव होता. त्याच्या सुधारित आवृत्त्या काढल्या. अलीकडच्या आवृत्तीत त्यांनी एक उत्कृष्ट छायाचित्र समाविष्ट केले आहे, ज्यात पुण्यातील पर्वती जलशुद्धीकरण केंद्राचे विविध टप्पे दिसून येतात .

बरे, नुसते पुस्तक प्रसिध्द करून चालणार नाही. ज्यांच्यासाठी ते निर्माण केले, त्यांचेपर्यंत ते पोचले पाहिजे. सुरुवात, महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळाच्या अभियंत्यांपासून झाली. परगावी जिथे जिथे आयवा चे कार्यक्रम होत, तिथे प्रती घेऊन जात, विक्री होई. आयवा च्या पुणे शाखेच्या वार्षिक अहवालात याबाबतचा उल्लेख आवर्जून केला जाई. परप्रांतीय अभियंत्यांनी या पुस्तकाच्या निर्मितीसाठी गौरवोद्गार काढले होते.

आयवा च्या पुणे शाखेचे ते २५ वर्षे सचिव होते. पुढे आयवा चे महासचिव झाले. मांडे मोठी स्वप्ने पहात असत. त्यांचा ध्यास घेत. नियोजन करीत असत. कष्टपूर्वक ही स्वप्ने सत्यात उतरवत असत. त्यासाठी मिळेल तिथून मदत घेत. पुण्यात नेटकेपणाने आयोजित आयवा च्या वार्षिक परिषदा संपन्न झाल्या. अन्य राज्यात आयोजित परिषदांना ते नियमितपणे उपस्थित असत. अमेरिकेत गेले तेव्हा तिथे अमेरिकन वॉटर वर्क्स् असोसिएशनच्या च्या पदाधिकार्यांना भेटले, चर्चा केली. त्याची माहिती इतरांना दिली. इंटरनॅशनल वॉटर वर्कस् असोसिएशन ला भेट दिली.

पुण्यनगरी मध्ये अलीकडे त्यांचे बरेच लेख प्रसिद्ध झाले . त्यापैकी, महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया होणार का ? व महाराष्ट्राचे सारे पाणी ऊसच पिउन टाकणार का ? हे लेख मला विशेष आवडले. विदारक परिस्थितीचे नेमके वर्णन केले होते. त्यावर मी माझे अभिप्राय पाठवले, त्यांनी त्यांचे स्वागत केले.

मांडेंचा ग्रंथ संग्रह प्रचंड होता. नुसती तांत्रिक विषयावरील पुस्तकेच नाही तर, साहित्य विषयक देखील. विविध मासिके. हे सारे ते वाचतात केव्हा, हा प्रश्न पडावा ! पुस्तके आणि मित्र यात ते रमणारे होते. चितळे साहेब यांच्याशी त्यांचे शेवटपर्यंत बोलणे होत असे. विज्ञान, साहित्य, कला, इतकेच काय, अगदी राजकीय, या क्षेत्रातील माननीय यांचेशी त्यांचा नुसता परिचय नव्हता, तर निकटचा संबंध होता. अनेक संस्थांशी त्यांचा संबंध होता, अनेक संस्थांचे ते सदस्य होते.

मांडे जुन्नर चे राहणारे . आपल्या गावाचा, तेथील महत्वाच्या व्यक्तींचा परिचय करून देणारी पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध केली होती .

गेल्या वर्षी, मी काही सहकार्यांच्या मदतीने, आठवणीतील सुवर्णकाळ ... महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा ! हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यासाठी त्यांनी आपल्याकडील माहिती उपलब्ध करून दिली. इथपर्यंत समजून घेता येईल. पण, त्यांनी १० प्रती विकत घेतल्या आणि, सर्वश्री चितळे साहेब, रानडे साहेब, मोरे साहेब, चेतन पंडित, प्रदीप पुरंदरे, देशकर यांना पाठवल्या ! ब्रिटिश काळापासून कार्यरत अशा , महाराष्ट्रातील पाणीपुरवठा यंत्रणेच्या प्रवासाची माहिती त्यांना मिळावी म्हणून !

मांडे यांना उत्तमपैकी सौंदर्यदृष्टी होती. त्यांच्या घरी गेलो की त्याची प्रचिती येते. घराची रचना, बैठकीची सजावट, काही देखणी शिल्पे व पेंटिंग्ज.

मांडे यांच्याबद्दल म्हणता येईल की, आपला प्रत्येक क्षण त्यांनी त्यांच्या आवडीच्या कामासाठी घालवला .

अशा या माझ्या साध्या, सरळ मित्राला भावपूर्ण श्रद्धांजली !

*****

## आदरणीय मांडे साहेब जीवन प्रवास .....

**श्री. नितीन कांतीलाल मेहता**

**मो : ९८६०२०४५७८**

मांडे कुटुंबीय आणि माझा संबंध १९७३-७४ ला आला त्यावेळेस मी इ. ११ वी मध्ये शिकत होतो. मांडे साहेबांचे वडील त्यावेळेस मला भूगोल विषय शिकवायला होते. ते संस्थेचे सेक्रेटरी सुद्धा होते त्यांच्याच काळात प्रेक्षागृहाचे काम झाले होते. श्री शरद मांडे आणि माझी प्रथम भेट नारायणगाव येथे झाली त्यावेळेस मी माजी विद्यार्थी संघाचा कार्याध्यक्ष होतो व मांडे साहेब अध्यक्ष होते नारायणगाव येथील परिवार हॉटेल मध्ये २०१२ ला आमची भेट झाली. मांडे साहेब २०१२ पासून माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष पद भूषवत होते. माजी विद्यार्थी संघाची वास्तू उभी करण्याची मनीषा मांडे साहेब कायम मांडत असत, खूप मोठ्या प्रमाणात विद्यार्थी या शाळेतून बाहेर पडले व मोठ्या मोठ्या पदावर कार्यरत झाले परंतु पुन्हा जुन्नरला आल्यानंतर या परिसरात वास्तव्य करता यावे अशी मांडे साहेबांची इच्छा असायची त्या भूमिकेतून ऋणानुबंध वास्तु उभी करण्याची कल्पना मनात रुजली, शाळेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी ऋणानुबंध ही वास्तू उभी करण्याचा निर्णय घेतला. वास्तू उभी करताना त्यांना वरचेवर जुन्नरला यावे लागे परंतु ते स्वखर्चाने येऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करून काम पूर्ण करून नेण्यासाठी नियोजन करत वेल प्लॅनर म्हणून त्यांचे कौतुक करावेसे वाटते, कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात

स्वतः पासून करावी या उक्तीप्रमाणे त्यांनी दोन रूमसाठी चार लाख रुपये देणगी दिली. ते कधीच रिकाम्या हाताने जुन्नरला आले नाही विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, खाऊ किंवा रोख रक्कम दिल्याशिवाय ते जात नव्हते. मांडे साहेबांचे राहणीमान साधे होते पण त्यांची विचारसरणी उच्च होती असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. पाणी प्रश्न व पर्यावरण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता फार लोकांशी त्यांचे जवळचे संबंध होते, यामध्ये शैक्षणिक, अध्यात्मिक, सामाजिक व संस्थाचालक अशा वैचारिक लोकांशी त्यांचे संबंध होते.

शरद मांडे साहेबांसोबत आगरकर हे त्यांचे वर्गमित्र नेहमी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके त्याचबरोबर रोख स्वरूपात देखील मदत करत असत. त्यांनी देखील या ऋणानुबंधन वास्तूमध्ये एक रूम दिली व या पद्धतीने हळूहळू ऋणानुबंध इमारतीसाठी पैसे जमण्यास सुरुवात झाली आणि मग माजी विद्यार्थी संघाच्या इतर सहकाऱ्यांनी देखील काही ना काही मदत करून पैशाचा हातभार लावून ऋणानुबंध ची वास्तु निर्माण झाली.

एका सर्वसामान्य शिक्षकांचा मुलगा हा महाराष्ट्र राज्याच्या पाणी परिषदेचा व पाणी संघाचा अध्यक्ष होऊ शकतो ही मांडे साहेबांच्या जीवनातील खूप मोठी घटना होती. कारण पाणी चळवळ योजनेमध्ये मांडे साहेबांनी दिलेल्या योगदानाची दाखल महाराष्ट्र सरकारने देखील घेतली होती, ही त्यांच्या सामाजिक कार्याची अतिशय महत्त्वाची बाब होती.

शरद मांडे साहेबांचं एक स्वप्न होतं की, माजी विद्यार्थी संघाचं रोप्य महोत्सवी वर्ष साजरा करायच आणि या महोत्सवसाठी एक मोठे पत्र त्यांनी आपल्या सर्व माजी विद्यार्थी संघातील सदस्यांना लिहिलेले होतं. यामध्ये रौप्य महोत्सवाचा नियोजन करत असताना कोरोनामुळे दोन वर्षाचा कालावधी व्यर्थ गेला परंतु या कालावधीमध्ये त्यांनी रौप्य महोत्सव कामकाज थांबवलं नाही तर प्रत्येक महिन्याला ते सर्व माजी विद्यार्थी संघातील सदस्यांसोबत फोनवर चर्चा करत असतात व या फोनवरील चर्चेनुसार प्रत्येक महिन्याला आपण काय ठरवलेलं होतं आणि हा महिना संपत असताना किती काम झालेला आहे व पुढील महिन्यात आपल्याला किती काम करायचं असेल याविषयीचा पत्र व्यवहार ते माजी विद्यार्थ्यांना करत असत.

**रौप्य महोत्सवानिमित्त वर्षभर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन खालील प्रमाणे :**

**शालेय कार्यक्रम :**

१) शालेय कार्यक्रम वर्षात सहा सर्वसाधारण विविध विषयांवरील नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेणे.

२) शालेय स्पर्धा: क्रीडा, प्रदर्शन रांगोळी व्यक्तिमत्व इत्यादी.

३) शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मार्गदर्शन कार्यक्रम.

४) शाळेतील दहावीची तयारी करणे बाबत पुस्तिका.

५) पालकांनी घ्यावयाच्या विद्यार्थ्यांच्या तयारीची पुस्तिका.

६) शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एक ड्रेस करणे.

७) मूकबधिर विद्यालयासाठी खास कार्यक्रम.

८) संगणक व आय.टी. व्यवसायदर्शक मार्गदर्शन.

९) प्रत्येक वर्गाला वीस पुस्तकांची एक बॅग फिरते वाचनालय.

१०) रौप्य महोत्सवी वर्षारंभ माजी विद्यार्थी मेळावा, मुख्य कार्यक्रम यावेळी वर्गाची सजावट व स्पर्धा.

**महिलासाठी कार्यक्रम:**

१) माजी विद्यार्थी महिला मेळावा.

२) महिलांच्या स्पर्धा.

३) महिलांचे शाळेशी नाते वृद्धिंगत करणे त्याबाबतचा कार्यक्रम.

४) सर्वसाधारण महिला मेळावा व कार्यक्रम.

**सांस्कृतिक कार्यक्रम :**

१) जुन्नर मधील नागरिकांसाठी दर दोन महिन्यातून खालील प्रमाणे **कार्यक्रम घेणे :**

गीत रामायण / मंतरलेल्या चैत्रबनात

इतिहासाच्या पाऊलखुणा

हिंदी सिने संगीत

हास्यरंग –मकरंद टिल्लू

व्यंगचित्र– पु.ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके व अब्दुल कलाम प्रदर्शन

नाटक – संतवाणी/मोगरा फुलला.

**२) शालेय विद्यार्थ्यांचे कार्यक्रम :**

नाट्य, नृत्य, नाटिका, कथाकथन काव्यगायन, प्रदर्शन इ.आयोजन करणे.

जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे जे प्रेक्षागृह उभे आहे ते प्रेक्षागृह मांडे साहेबांचे वडील सेक्रेटरी असताना त्या ठिकाणी बांधण्यात आले होते. व या प्रेक्षागृहाच्या बाबत देखील मांडे साहेबाच्या मनात खूप मोठा मानस होता, त्यांनी हे प्रेक्षागृह मोठ करावं यासंबंधी मी प्रयत्न करेल व माझे सर्व योगदान देईल अशा पद्धतीचा आपल्या सहकारी माजी विद्यार्थ्यांना एक संदेश दिलेला होता. या प्रेक्षागृहाच्या इमारतीमध्ये जुन्नर एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यामध्ये गुरुवर्य रा. प. सबनीस यांचे खूप मोठे योगदान आहे म्हणून या प्रेक्षागृहास गुरुवर्य रा. प. सबनीस यांचे नाव असावे तसेच या प्रेक्षागृहाच्या माध्यमातून त्यांचं नाव हे मोठं व्हावं असा त्यांचा प्रयत्न होता.

मांडे साहेबांची संध्याकाळ ही जुन्नर एज्युकेशन सोसायटीसाठी होती. कारण त्यांचा जन्म जरी जुन्नर तालुक्यामध्ये झाला असला तरी त्यांची कर्मभूमी ही पुणे होती परंतु कर्मभूमी पुणे असली तरी देखील त्यांच्या जीवनाची संध्याकाळ ही जुन्नर एज्युकेशन सोसायटी व माजी विद्यार्थी संघातील सहकाऱ्यांबरोबर चर्चा करून आपल्याला जुन्नर एज्युकेशन सोसायटीसाठी काय करता येईल तसेच भावी विद्यार्थी घडविण्यासाठी आपण काय केले पाहिजे या संदर्भातील चर्चेमध्ये ते ही संध्याकाळ खर्च करत असत. जीवनाच्या शेवटच्या प्रवासामध्ये देखील त्यांनी जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे नियोजन व विद्यार्थ्यांसाठी काय करणार आहोत याविषयीचे अचूक नियोजन तयार केलेले होते.

**शब्दांकन :** मा. श्री. नितीन कांतीलाल मेहता

माजी कार्याध्यक्ष, जुन्नर एज्युकेशन सोसायटी व माजी विद्यार्थी संघ, जुन्नर

*****

# श्री शरद मांडे - निर्मलतेचा शाश्वत झरा

**श्री. गजानन देशपांडे, पुणे**

**मो : ९८२२७५४७६८**



दिनांक २१ ऑगस्टला रात्री मोरवंचिकर सरांचा अचानक फोन आला व म्हणाले गजानन काही तरी सांगायचं आहे, पण बातमी चांगली नाही. हिम्मतीने घेणार असशील तर सांगतो, नाही तर उद्या सांगिन. मी त्यावर म्हणालो, तुम्हाला काहीतरी सागून मन हलकं करायचं आहे, असं दिसतय, तेव्हा आत्ताच सांगा, मी ते धीराने घेईन...आणि श्री शरद मांडे यांच्या आकस्मिक निधनाची ती घणाघाती वार्ता त्यांनी दिली. मन अक्षरश: सुन्न झाले. सर्वांचे सदैव भले चिंतणारा आनंदाचा एक निरंतर ठेवा - वडीलधारा आता कायमचा आपल्यापासून दूर गेला आहे, याची जाणीव झाली. सदैव हव्या हव्याशा वाटणाऱ्या, हसत खेळत राहणाऱ्या, निरपेक्ष भावनेतून सामाजकार्यात सहभाग घेणाऱ्या, कुणालाही आपल्यापासून त्रास होणार नाही याची दक्षता घेणाऱ्या या सत्पुरूषाला नियतीने असे आपल्यातून हिरावून न्यावे, ही भावनाच मनास खूप व्यथीत करणारी आहे.

श्री शरद मांडे यांचेशी जलसंस्कृती मंडळाच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध कार्यातून अनेक वर्षांचा घट्ट स्नेह जूळून आला होता आणि त्या सान्निध्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेक वैशिष्ट्यांचे जवळून दर्शन झाले. शरद मांडे हे विलक्षण असं एक व्यक्तीमत्व. मुळात ते एक कटुंबवत्सल गृहस्थ. लोकांनी आपल्या कडे यावे, आपण त्यांच्याकडे जावे, हे त्यांना मनापासून आवडायचे. त्याचबरोबर एक प्रज्ञावंत शासकीय अधिकारी, एक कुशल संघटक, एक कष्टाळु कार्यकर्ता अशा त्यांच्या अनेक बाजू होत्या. कौटुंबिक आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर आपण सर्वांना हवेहवेसे वाटणे व आपले आयुष्य हे अनेकांना लाभदायी होणे, यात जीवनाची कृतकृत्यता समजली जाते. श्री शरद मांडे यांना ते साधले होते.

महाराष्ट्र जीवन प्राधीकरण या संस्थेत बरीच वर्षे काम केल्यानंतर तिथून त्यांनी स्वेच्छा निवृत्ती पत्करली होती आणि नंतर स्वतःची एक सल्लागार संस्था  स्थापन केली. या संस्थेमार्फत त्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी जलासंदर्भात अनेक सल्लागार कामे पार पाडली. देहूरोड कँटॉनमेंट बोर्ड आणि अँबिव्हॅली येथे ते प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून ते काही काळ काम बघत असत.

श्री  शरद मांडे हे जलविकासाच्या क्षेत्रात अनेक संघटनांशी घट्टपणे जोडलेले होते. ते नुसतेच या संघटनांच्या कामात संलग्न होते, असे नव्हे, तर त्या संस्थांच्या कामात ते स्व:तला पूर्णपणे वाहून घेत असत. हा विशेष गुण त्यांचा स्थायिभावच म्हणावा लागेल. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन या संस्थेचे अनेक वर्षे असलेले पदाधिकारी म्हणून त्यांना आपण ओळखतो. ते बरीच वर्षे पुणे शाखेचे प्रमुखही होते. तसेच त्या संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारीणीचेही ते काही वर्ष सचिव होते. संस्थेला नावारुपाला आणण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या या सहयोगाची परिणती त्या संस्थेने मुंबईला स्वतःची जी इमारत बांधली त्या सुंदर वास्तुमधे व त्या वास्तुंतील प्रगतिशील वातावरणांत अनुभवायला मिळते.

स्वयंस्फूर्तीने समाजाची विविध अंगे निकोप व सुदृढ करण्यासाठी प्रयत्नशिल रहाणे व त्यासाठी गाजावाजा न करता झीज सोसणे, ही खरी इतिकर्तव्यतेची सिध्दी आहे. सजग वर्तणुकीने त्यांनी ती प्राप्त केली होती. एखादी सामाजिक जबाबदारी स्वीकारली की ती जास्तित जास्त प्रभावीपणे व विहित वेळेत कशी पार पाडली जाईल यासाठी कितीही कष्ट उपसण्याची त्यांची कायम तयारी असायची. यातून स्वत:ला खूप त्रास झाला तरी त्याची त्यांना पर्वा नसे. त्याचबरोबर दुसऱ्यांना मात्र त्यातून फार त्रास होऊ नये, याची ते खबरदारी घेत असत आणि त्यासाठी अधिकाधीक कामे ते स्वत:च पार पाडण्याचा प्रयत्न करत. त्यांना गुरूस्थानी ठेऊन पाणी विकास क्षेत्रात अनेक कार्यकर्ते निर्माण झाले.

त्यांच्या लेखन कार्यास चांगली गती होती व लेखणीस ईश्वरी वरदान लाभले होते. त्यांची ही वैशिष्ट्ये मला अधिक भावणारी होती. त्यांचे स्वत:चे उत्तम व विपुल ग्रंथसंपदा असलेले ग्रंथालय आहे. ज्यात अनेक दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. ते पाण्याविषयी अनेक नवनविन पुस्तके सातत्याने खरेदी करत व प्रत्यक्ष भेटीत त्याबद्दल भरभरून वर्णन करून सांगत.

आम्हा कार्यकर्त्यांचे कुठे काही लिखाण त्यांच्या वाचनात आल्यास त्याचे ते समरसून वाचन करीत व त्यातील महत्वाच्या मुद्यांना पेन्सिलने अधोरेखीत करून ठेवत. ही त्यांची एक खासीयत होती व त्याबद्दल नंतर फोन करून आवर्जून चर्चा करायला ते विसरत नसत व मग किमान तासभर यावर चर्चा चाले.

शरद मांडे यांचे आकस्मिकपणे निघून जाणे ही त्यांचे कुटूंबीय तसेच त्यांच्या सांन्रीध्यात असलेल्या सर्व स्नेहीजनांसाठी मोठा आघात करणारी घटना आहे. शब्दात व्यक्त करणे ते केवळ अशक्य आहे. त्यांच्यासारख्या सत्शिल मनुष्याचे सान्नीध्य लाभले, हा मी एक मोठा प्रारब्ध योगच मानतो. अशा या महान सुऱ्हुदाला माझे विनम्र अभिवादन !

*****

# ध्येयवेडा... कर्मयोगी.... स्वर्गीय शरद मांडे

**श्री. प्रफुल्ल कुलकर्णी**

**मो : ९४२३००७८३०**

आदरणीय शरद मांडे सर यांचे दु:खद निधन झाल्याचा फोन निलेश याने केला. बातमी ऐकून मन सुन्न झाले. एका ध्येयवेड्या, समर्पित जीवनाची अखेर झाली. एक कार्यमग्न जीवन चिर विश्रांतीसाठी कायमचे निघून गेले.

कार्य मग्नता जीवन व्हावे , मृत्यू ही विश्रांती ही युक्ती कृती प्रमाणे श्री. मांडे सर जगले. काही व्यक्तींचा सहवास हे भाग्य असते. अशांपैकी श्री. मांडे यांचे व्यक्तिमत्व होते.

ते माझे गावचे म्हणजे जुन्नरचे. त्यांचा जन्म जुन्नर येथे झाला. त्यांचे शाले. शिक्षण जुन्नर येथील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय (न्यू.स्कूल) जुन्नर या शाळेत झाले. त्यांचे स्वर्गीय वडील हे ह्याच शाळेत शिक्षक तसेच नंतर मुख्याध्यापक म्हणून कार्य करीत होते. मॅट्रिक नंतर पुणे येथे येवून त्यांनी पुढील अभियांत्रिकीचे शिक्षण घेवून शासकीय सेवेत काम करण्याची संधी प्राप्त केली. ७९ वर्षाच्या कालखंडात त्यांनी जवळपास ५० वर्षे होवून अधिक काळ पाणी, त्याची सुरक्षा, पर्यावरण इत्यादी क्षेत्रात भरीव कार्य केले. १९९७ साली त्यांनी सेवेच्छा निवृत्ती घेतली. त्यावेळी ते जागतिक बँकेच्या एका प्रकल्पाचे पुणे विभागाचे प्रमुख अभियंता होते.

माझा व त्यांचा परिचय हा गेल्या १२ वर्षांपासून आहे. त्यांच्या परिचयाचे मुख्य कारण म्हणजे आमची जुन्नरची शाळा आहे. त्या शाळेच्या माजी विद्यार्थी संघाचे श्री. मांडे २०११ पासून अध्यक्ष म्हणून काम पात आहेत. मी या जुन्नरच्या शाळेचा माजी विद्यार्थी आहे. २०१६ ते २०२२ असे ६ वर्षे ते अध्यक्ष व मी कार्याध्यक्ष म्हणून माजी विद्यार्थी संघाचे काम पाहत आहोत. गेली ६ वर्ष माजी विद्यार्थी संधाचे कामानिमित्त त्यांच्याबरोबर खूप वेळा भेट झाली, चर्चा झाली. त्यांच्या घरी नियमित जाणे होत असे, बऱ्याच वेळा आम्ही बरोबर प्रवास केला. अनेक माजी विद्यार्थ्यांशी संपर्क केला. अनेक कार्यक्रमात सहभाग घेतला. माझ्या जीवनातील हा ६ वर्षांचा काळ उत्साहाने व प्रेरणेने भरला गेला आहे. त्याचे मुख्य कारण श्री. मांडे सर.

प्रत्येक भेटीत माझ्या कुटुंबातील सर्वांची ते आस्थेने चौकशी करीत असत. जानेवारी २०२१ मध्ये माझ्या मुलाने व सुनेने नर्मदा परिक्रमा करायचे ठरवले. श्री. मांडे हे ते दोघे परिक्रमेला जाण्यापूर्वी त्या उभयातांना भेटून नमस्कार करून गेले. परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर १४ मे २०२२ रोजू सुध्दा श्री. मांडे त्यांचे दर्शन घेण्यासाठी आवर्जून घरी आले होते. वयाने लहान असणाऱ्या माझ्या मुलाला व सुनेला त्यांनी वाकून केलेला नमस्कार हा आम्हा कुटुंबियांसाठी प्रेरक व मार्गदर्शक, संस्कारित चिर संस्मरणीय प्रसंग आहे. श्री. मांडे यांचे व्यक्तीमत्व असे होते. ते अलौकिक बुध्दिमत्तेचे होते. त्यांचे वाचन अफाट होते. वाचलेले स्मरणात ठेवण्याची विशेष हातोटी होती. प्रचंड जनसंपर्क होता. अनेक संस्थांचे मार्गदर्शक व आधारस्तंभ होते. संपर्कात आलेल्या सर्वांशी सामान्य व्यवहार होता. परिचित असलेल्या व संपर्कात आलेल्या सामान्य परिस्थितीतील सहकाऱ्यांच्या घरी जाण्यात त्यांनी कधीही संकोच केला नाही. ते नेहमीच इतरांच्या गुणांना हेरून प्रोत्साहन देत असत. त्यांच्याबरोबर काम करणारा निलेश हा सावली सारखा त्यांचा पाठीराखा होता. निलेश हा त्यांचा उजवा हात होता. प्रामाणिक व विश्वासू निलेशवर श्री. मांडे सरांचे अकृत्रिम प्रेम व स्नेह होता. ही कृतज्ञता त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवली.

आमचे माजी विद्यार्थी संघाचे रौप्य महोत्सवी वर्ष विविध भरगच्च कार्यक्रमांनी साजरे करण्याचे सूक्ष्म नियोजन त्यांनी आम्हा सर्वांबरोबर चर्चा करून निश्चित केले होते. करोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमुळे जगाचे जीवन विस्कळीत झाले. त्याचा स्वाभाविक परिणाम आमच्या रौप्य सहोत्सवी वर्ष कार्यक्रमावर झाला. निर्धारित रौप्य महोत्सवी वर्षाचे सर्व कार्यक्रम त्यावेळी पुढे ढकलावे लागले. आता परिस्थिती सामान्य झाल्याने पुनश्च त्यांनी यावर्षी हे सर्व कार्यक्रम पूर्ण करण्याचा संकल्प केला होता. त्यांच्यासारखा अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीचा कृतीशील व गतीशील सहभाग हा आम्हा सर्वांना नेहमीच प्रेरित करत आलेला आहे.

समाजाचे आपण सारेच देणे लागतो. त्याची परतफेड प्रत्येकाने केलीच पाहिजे असे त्यांचे प्रांजळ मत होते. ते स्वत: ध्येयवेडे होवून जगले. संपर्कातील सर्वांना प्रामाणिकपणे काम करण्याची स्फूर्ती देत राहिले. वयाच्या ७९ – ८० वर्षात अनेकजण घरात कुटुंबात राहून दगदगीचा प्रवास कार्यक्रम टाळतात. या वयात त्याची आवश्यकता ही असते. परंतु श्री. मांडे त्यास अपवाद होते. वयाच्या ८० वर्षीही त्यांच्या हालचाली तरूणास लाजवेल अशी होती. कधी कधी त्यांच्या गतीशी जुळवून घेणे जमत नसे.

जन्म – मृत्यू हे अगोदर माहित नसतात. जन्माला येणारा प्रत्येक जण कधीतरी जाणारच असतो. हे माहित असे तरी जिव्हाळ्याचे व आपुलकीचे ऋणानुबंध असलेले श्री. मांडे सरांची एक्झिट न समजण्यासारखी आहे. त्यांची निरंतर आठवण ही आम्हा सर्व माजी विद्यार्थ्यांसाठी नेहमीच प्रेरणा देत राहील. त्यांच्या पवित्र स्मृतीस मी जुन्नरच्या शाळेतील सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने व जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

*****

# शरद मांडे - एक वेगळे व्यक्तिमत्त्व

**श्री. अरूण मांडे**

**(श्री. शरद मांडे यांचे सुपुत्र)**

सर्वप्रथम मी श्री. डॉ. दत्ता देशकर यांचे सर्व मांडे कुटुंबीय कडुन हा जलसंवादचा स्वर्गीय शरद मांडे स्मृती अंक प्रकाशित करत असल्याबद्दल आभार मानतो. बाबांचे २१ ऑगस्ट २०२२ ला दुपारी ४ नंतर निधन झाले. दोन दिवसानंतर काका घरी आले होते आणि त्यांनी ह्या अंकाची कल्पना दिली. बाबा जलसंवादबद्दल खुप भरभरून बोलायाचे आणि कधी कधी हार्डकॉपी मला द्यायला घेवुन यायचे. खरं तर बाबांबद्दल काकांनी लेख लिहिण्यास सांगितले तेंव्हा मी काय लिहिणार आणि येवढं सर्व काही कस लिहिणार हा मला मोठा प्रश्न पडला. बाबांसारखं मुद्देसुद आणि न चुका करता लिखाण मला कधीच जमले नाही आणि आता मराठी लिखाण व्हॉट्सॅप टाइप झाले, तरी कृपया शुद्धलेखन आणि बाकी चुका माफ कराव्यात.

बाबांची आम्हाला शिकवण त्यांच्यासारखीच होती, स्वच्छ निष्प्रभ, साधी सरळ, शिक्षण, खरेपणा याला महत्व. चंगळ नाही, पण चांगल्या गोष्टीसाठी नेहमीच पाठिंबा. पँटसाठी नाही म्हणतील पण चित्रकलेसाठी उत्तम साहित्य आणून देतील. चित्रपटासाठी सोडणार नाहीत, पण सिंहगड ट्रीप किंवा चांगल्या कार्यक्रमासाठी स्वतः घेवुन जातील. नेहमीच चांगले कार्यक्रम, चांगले शिल्प, कलाकृती, चांगला बंगला किंवा चांगली इन्स्टिट्यूट आयुकासारखी, चांगल्या व्यक्तींशी गाठ घालुन देतील. मला अजुन आठवत आहे, मी कॉलेज मध्ये असताना एका संध्याकाळी मित्रांबरोबर खेळत होतो आणि बाबा आले व म्हणाले चल माझ्याबरोबर, मी मनातून जरा चिडलोच पण बाबांना नाही म्हणायची हिम्मत नाही. मला स्कूटरवर घेऊन निघाले, वाटेत एक फुलांचा गुच्छ घेतला आणि गाडी एन.सि.ल. कडे. आम्ही पोचलो आणि नेहमी प्रमाणे त्यांनी बाहेर बोलुन आत जाण्याची परवानगी काढून घेतली. आम्ही कॉरिडॉरमध्ये वाट बघत बसलो. खुप वेळाने अगदी शेवटी आम्हाला आत जाण्यास परवानगी मिळाली. आणि आत गेलो तर बाबा मला आदरणीय डॉ. रघुनाथ माशेलकर ह्यांना भेटायला घेवुन आले होते. एन.सि.ल. मधुन ते दिल्लीला सेंट्रल मध्ये मोठ्या पदावर नियुक्त झाले होते. आमच्या वर चांगले संस्कार व्हावेत म्हणुन ते असे सतत प्रयत्न करत होते.

आम्ही मोठे झाल्यावर आमच्या कर्तुत्वाबरोबर त्यांना ह्याचा मोठा अभिमान होता की आमच्या ॲडमिशन किंवा नोकरीसाठी त्यांना त्यांच्या ओळखीचा वापर करावा लागला नाही आणि ह्यात आमचे काही नसुन त्यांचे आणि आईचे संस्कार आहेत.

मी सिवील इंजिनिअरिंगला सिओईपीला असताना बाबांचे पाणी क्षेत्रात किती मोठे नाव आहे ते समजले. आय डब्ल्यू डब्ल्यू ए आणि इन्स्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्स मध्ये असल्याने सीनियर प्रोफेसरस ओळखत होते.

ते पहिल्यांदा अमेरिकेला आले ते २००५ ला आणि तेही अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन च्या कन्व्हेन्शनसाठी. त्याआधी






**आपल्या मुलांच्या लग्नात त्यांनी त्यावेळेच्या जागतिक ऑर्गनायझेशन ह्यांच्या चालू विचारांवर म्युरल केले- वॉटर फॉर लाइफ आणि वॉटर फॉर पिपल.**



**थर्ड इंटरनॅशनल वॉटर फोरम इस्तंबूल २०१४. तेंव्हा इजिप्तमध्ये**

बऱ्याच वेळा बोलावले पण आले नाहीत. ते कन्व्हेन्शनसाठी आले की तिथले वॉटर आणि वेस्टवॉटर ट्रिटमेंट प्लांट बघुन यायचे. त्यात शिकागोमधील वॉटर प्लांट 'जार्डीन वॉटर प्युरिफिकेशन प्लांट' जो जगातील एक सगळ्यात मोठा प्लांट आहे. तसेच 'स्टिकनी वॉटर रेक्लेमेशन प्लांट' जो शिकागोमधील वेस्टवॉटर ट्रिटमेंट प्लांट आहे, जगातील एक सगळ्यात मोठा प्लांट आहे, ६,५०० एम. एल. डी. ते नुसतेच कन्व्हेन्शन नाही तर तेंव्हा होणारे सेमिनार, वॉटर मधील इन्स्टिट्यूट बघणे, प्रोफेसरस, एक्स्पर्ट ह्यांना भेटणे असे बाकी सर्व काही करायचे. एकदा गम्मत झाली, बाबा शिकागोला २०१६ला अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशनच्या कन्व्हेन्शनसाठी आले होते. माझे ऑफिस बघायला आले होते आणि आमच्या लॉबीमध्ये पाण्यावरील खुप छान पुस्तक वाचत होते. तिकडून आमचा सि.ई.ओ. आन्डी रिचर्ड रिचर्डसन आला आणि बाबांना म्हणाला शरद हॉऊ आर यु? व्हॉट आर यु डुईंग हियर? ते दोघे २००५ च्या कन्व्हेन्शनला भेटले होते आणि आन्डी तेंव्हा अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशनचा प्रेसिडेंट होता. मला एकदम आश्चर्य वाटले की आन्डी सारख्या माणसाला येवढ्या वर्षानंतर बाबा आठवत होते.




**कुटुंबाबरोबर**

बाबांचा साहित्यातील लोकांबरोबर पत्रव्यवहार किंवा मैत्री होती आणि त्यातील एक म्हणजे डॉ. घनशाम बोरकर. त्यांची आणि बाबांची निखळ मैत्री गेल्या १०-१२ वर्षातील पण अनेक दशकांचा सहवास असावा अशी प्रगाढ आणि निर्हेतुक मैत्री होती. बोरकर काका कवीवर्य बा. भ. बोरकर ह्यांचे पुतणे. २००९ ला त्यांनी बा. भ. बोरकर ह्यांच्या कवितांवर कार्यक्रम चालु केले होते. ते कार्यक्रम बघुन आणि त्यावरील लेख वाचून बाबांनी त्यांना नेहमीसारखा संपर्क केला आणि त्या संपर्कातून पुढे ही घनिष्ठ मैत्री झाली. बाबा बरे नसल्याचे कळल्यावर ते १४ ऑगस्टला रात्री घरी आले. त्यांना आदल्या दिवशीच आचार्य अत्रे पुरस्कार मिळाला होता आणि न रहावून ते घरी आले. बाबांना बेडवर बघुन त्यांना खुप वाईट वाटले. बाबांनी त्यांना ओळखले आणि चक्क आठवून पुरस्काराबद्दल विचारले. आम्हालाच आश्चर्य वाटले. त्या दोघांनी गोव्यात बोरकर स्मारक बांधण्याबद्दल दोन वाक्यं गप्पा मारल्या. बाबांना येवढी शक्ति कुठुन आली याचे आम्हालाच आश्चर्य वाटले. हा सगळा संवाद पाच दहा मिनिटांचा. त्यात शेवटी दोघांनी बा. भ. बोरकर ह्यांच्या कवितांच्या दोन दोन ओळी मोठ्याने गायल्या आगदी निरागस आत्मिक समाधानाने. माझ्यासाठी तरी त्यांचा तेंव्हाचा तो आनंदी चेहरा हीच खरी शेवटची आठवण.

एकंदरीत गेल्या काही दिवसांपासून सगळ्यांकडून बाबांबद्दल जे विचार ऐकत आलो त्यावरून वाटते की बाबांकडून पाणी हा विषय का निवडला असेल. ते पण पाण्यासारखे अगदी स्वच्छ आणि निरभ्र होते.

*****

## Eulogy – To Aaba –Sharad Mande

**Soham Deshpande (Grandson)**

Mr Sharad Mande, our aaba, shared his love with all us, he would often tell us stories of his childhood and compare it to the life we are living today. On videocalls he would always be the loudest person to make sure all of us grandchildren knew he was there. His sweetness was one to be envious of from his trips to Chitale and his heart.

He was very fond of his sciences, talking a lot about Hawking's and Feynman's theories.

Aaba would spontaneously plan a trip to visit dams, to show us his work that he was so passionate about. He made it his goal to make sure we understand water management from when I first had conversations with him till the end when we gave him medicine. There have been many trips to his projects such as Khadakwasla where he proudly explained the features while reciting the stats.

Aaba loved to travel from Tokyo to Egypt. He would always bring back something for us from all these exotic places that we will treasure forever. His favourite plane seemed to be Concorde as shown by the model he bought. We spent many hours playing together with the Concorde that would lift its nose up, adjust flaps before finally moving forward.

He would always send all us grandchildren boxes at Diwali that were filled with sweets, frocks and bakharwadis. We would always wait in anticipation, trying to figure out how many days it has been since it was sent. Once arrived the whole box would be emptied on a video call to them and then finished within a week.

Aaba was passionate about writing as well, always writing us and others letters.

Everyday you would see him with his glasses and his Parker pen that he would carry everywhere he went, writing an article for magazines. He adored his poetry, frequently quoting lines that would capture the moment we were living.

And so I would like to share an extract from a Wordsworth poem that I believe

**he would want us to share :**

Though nothing can bring back the hour
Of splendor in the grass, of glory in the flower?
We will grieve not, rather find
Strength in what remains behind;



# आमचे उत्साही बाबा


## श्रीमती गीतांजली शेवडे

**(श्री. शरद मांडे यांची कन्या)**


बालपणीचे बाबा आठवतात ते म्हणजे कडक शिस्तीचे. कसबा पेठेतल्या वाड्यात आम्ही ५ जण छोट्याश्या घरात राहायचो. बाबा आम्हाला उत्साहाने शनिवार वाड्यावर खेळायला घेऊन जायचे. स्वतःच्या फियाट गाडीतून दिमाखात चक्कर मारणे हि संध्याकाळची आवडती गोष्ट. घराच्या खूप जबाबदाऱ्या अंगावर असूनही त्यांचा उंची स्वप्ने बघायचा स्वभाव तेव्हाच जाणवला जेव्हा १९८१-८२ च्या सुमारास कोथरूडला ऐसपैस जागा घेतली. पै पै गोळाकरून एक बंगला बांधायला सुरुवात केली. १९८६ ला जेव्हा तिथे राहायला लागलो तेव्हाचे शांत, रम्य वातावरण, मोकळी हवा आणि आम्हा भावंडांना शिक्षणासाठी उत्तेजक कोथरूड आम्हा सर्वांना भावले. बाबांचा धाक खूप. आम्हांला कधी अभ्यास करा सांगायचे नाहीत पण शाळेत प्रगती असावी अशी त्यांची शिकवण. अभ्यासाचे दडपण कधीच नाही आणले. उलटं पुस्तके बंद करून बाहेर छान खेळा, निसर्ग अनुभवा असे म्हणायचे. घरात सर्वांनी रात्रीचे जेवण एकत्र करायचे हा अलिखित नियम. जे काही आईने बनवले असेल ते सर्वांनी आनंदाने खावे. पानात वाढलेला प्रत्येक पदार्थ आवडो अथवा न आवडो तो थोडातरी खायचा, अशी शिकवण. त्यामुळे एकमेकांच्या आवडी निवडीचा आदर करायला आणि अन्न वाया न घालवायची सवय लागली.

मोठी मोठी स्वप्ने बघा आणि ती सत्यात उतरवण्यासाठी अपार कष्ट करा. या रस्त्यावर जाताना समाजातील गरजू लोकांना मदत करायला विसरू नका असे स्वतःच्या वागणुकीतून ते शिकवायचे. त्यांनी ऑफिसमध्ये घेतलेले प्रामाणिक कष्ट व IWWA - मार्फत सुरु केलेले समाज कार्य अजूनही आठवते. घरात आनंदाने एकत्र पारंपरिक पद्धतीने सण साजरे करणे खूप पसंत तसेच बाहेरच्या कामात ते उत्साहाने भाग घेत. लहानपणी त्यांची भीती वाटायची कारण आमच्याकडून फक्त प्रामाणिक पणे वागा अशी त्यांची स्वच्छ इच्छा. वर्गात खूप मार्क, पहिला क्रमांक आणा असं नाही पण चांगली वागणूक असावी अशी अपेक्षा. मी १०वी च्या मार्कांची आतुरतेने वाट बघत होते आणि त्यांना मी कितवीत आहे हे पण लक्षात नव्हते. मला राग आला. पण जेव्हा माझा उत्कृष्ट निकाल लागला तेव्हा माझ्या यशाचे सर्वात जास्त कौतुक त्यांनाच. आमचे यश हे सगळ्यांच्या कष्टाचे फळ आहे, समाजातील इतरांना मदत करून, पाय जमिनीवर ठेऊन यश पचवा अशी शिकवण. आपल्याकडे नसलेल्या सुखसोयींचा बाऊ करण्यापेक्षा आहे त्या परिस्थितीला गोड मानून कष्ट घ्या. उगाच एकमेकांशी तुलना करून पहिला क्रमांक आणण्यापेक्षा काय ज्ञान मिळाले याचा विचार करा असे म्हणायचे. ह्या संस्कारांनी यश पचवणे खूप सोपे गेले. बाबा अतिशय रुढीप्रिय होते. पण मुलगा मुलगी असा भेदभाव त्यांनी केला नाही. आम्हा दोन्ही बहिणींना अभियांत्रिकीचे शिक्षण घ्यायला प्रवृत्त केले. पुढील शिक्षणासाठी देशाबाहेर जायची माझी वेळ आली तेव्हा ते खूप भावुक झाले. समोर असलेल्या सोन्यासारख्या संधीचे सार्थक करा, खूप शिका पण स्वभूमीचे संस्कार, आपल्या माणसांना कधी विसरू नका. स्वतःवर विश्वास ठेऊन जगाचा अनुभव घ्या, मी तुमच्या पाठीशी आहे.







१९९५-२००५ हा काळ त्यांचा पाणी पुरवठा

योजना व सामाजिक कार्यात मग्न गेला. खूप मागे लागल्यावर २००५ नंतर ते पहिल्यांदा अमेरिकेला आले. नवीन ठिकाणांना भेट देण्याचा त्यांचा उत्साह दांडगा. कॅलिफोर्नियाची ओळखच त्यांनी जगविख्यात विद्यापीठ कॅलटेक विद्यापीठापासून केली. फिरायच्या आवडी पुढे खाणे पिणे विसरून जायचे. आम्ही दोघेही ऑफिसच्या कामात मग्न. बाबा म्हणून सकाळीच विद्यापीठात नंतर पुस्तकांच्या दुकानात मनसोक्त फिरायचे. संध्याकाळी घ्यायला गेले की ओंजळ भरभरून ज्ञानभांडार वाढलेले. आणि मित्र परिवारात वाटायला सज्ज. कॅलटेक मध्ये अनेक नोबेल पारितोषिक मिळवलेल्या प्रशिक्षकांची कार्यालये ते बघून यायचे. स्टोकहोम पाणी पारितोषिक विजेते मॉर्गन प्रोफेसरशी त्यांनी संवाद साधला. आइनस्टाइन त्यांचा आवडता शास्त्रज्ञ, त्याच्या कॅलटेक मधील आइनस्टाइन पेपर प्रोजेक्ट ला ते आवर्जून भेट देत. त्यांचे जावई नासामध्ये वैज्ञानिक ह्याचा अतिशय अभिमान. मंगळ यानाची प्रतिकृती बघायला मिळाल्यावर त्यांना मंगळावर पाणी असेल का हाच प्रश्न. वेगवेगळ्या विद्यापीठांना भेट देणे त्यांचा छंदच जणू. सॅन होजे ह्या सिलिकॉन व्हॅली म्हणून प्रसिद्ध असलेल्या जागेचे खूप कौतुक. तिथल्या प्रेक्षणीय स्थळांबरोबरच बर्कली विद्यापीठ फिरायचे होते. मला वेळ नव्हता तर ते १ तास एकटे प्रवास करून, आमच्या मित्राकडे रात्री राहून दुसऱ्या दिवशी एकटे रस्ता शोधत वेगवेगळ्या विभागांना भेटी देऊनच परतले. तसेच स्टॅनफर्ड विद्यापीठातील सुंदर बिल्डींग्स सोबत रोदीन च्या पुतळ्यांची बाग अवश्य बघितली. थिंकर नावाच्या त्या जगप्रसिद्ध शिल्पावरचे त्यांचे प्रेम अनोखे. यूएससी विद्यापीठातल्या इमारती तर त्यांच्या खूप आवडीच्या. तसेच यूसीएलए विद्यापीठाला दोन बस बदलून भेट दिली. तेथील गेटी सेंटर हे जगप्रसिद्ध संग्रहालय त्यांना खूप आवडले. मेघदूत साहित्य, कविता, पाणी आणि व्यवस्थापन अशा भिन्न भिन्न विषयांचे सखोल वाचन काही अजबच.

लास वेगास, हूवर धरण, ग्रँड कॅनियन ही सहल ठरवली. त्यांच्या नजरेतून हि ठिकाणे बघणे एक विलक्षण अनुभव असायचा. त्या त्या जागेचा विकास कधी, कसा झाला याची ऐतिहासिक माहिती. वेगासच्या कॅसिनोंच्या झगमटानें त्यांचे डोळे दिपले पण त्यांची खरी ओढ ती जातानाच्या वाळवंटातील पाण्याच्या पाइपलाइन कडे. तिथल्या पाणी पुरवठ्याचा, हूवर धरणाचा त्यांचा अभ्यास जोखणण्यासारखा. तिथे घेतलेल्या २ तासांच्या अभ्यास सहलीत त्यांनी जितकी माहिती ग्रहण केली ती अफाट. ती पत्रातून सर्वांपर्यंत पोचविली. त्याबरोबरीनेच भारतातील धरणांची माहिती पण त्यांना मुखोद्गत होती. पुढे भारताच्या पंचवार्षिक योजनांच्या कामांमध्ये या माहितीचा उपयोग झाला. IWWA- आणि अमेरिकन वॉटर वर्क्स च्या अनेक परिषदांसाठी ते अमेरिकेत उपस्थित राहिले. निसर्गातील सौंदर्य शोधणे, साहित्याचे वाचन आणि पाणी क्षेत्रातील सखोल अभ्यास ह्या गोष्टी प्रथम. बाकी ऐहिक सुखांकडे नेहेमी दुय्यम नजरेने बघायचे. लॉस अँजेल्स इथल्या लमाल नावाच्या मराठी लिखाण ग्रुप मध्ये वेगळ्या विषयांवर लिहायचे. १५-२० पाने बिन चुकता सलग सुंदर हस्ताक्षर बघून खूप कौतुक वाटायचे. पुण्यनगरीत लिहिलेल्या त्यांच्या लिखाणात अमेरिकेतल्या अनुभवांची, इथे केलेल्या वाचनाची झलक दिसते.

परदेशातून आम्ही येणार असलो की पुष्पगुच्छ आणि नावा तारखेसकट रांगोळीने स्वागत करायचे ते हि डोक्यावर टोपी घालून. तसाच निरोप आम्ही परत निघालो की. गेले २२-२३ वर्षांची हि त्यांची आनंद-दुःख सामावून घ्यायची पद्धत आम्हाला सतत आठवत राहील. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांचा अनेक गोष्टीतील उत्साह हाच आम्हाला पुढील वाटचालीचा दिवा दाखवेल.

- बाबांची कन्या





# कै. शरद मांडे - एक मनस्वी व्यक्तिमत्व

**श्री. प्र.र. देशपांडे, पुणे**

**मो : ९७६९१८७२७५**

१९५९ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत असलेले शरद मांडे यांनी १९९७ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतलेली होती. त्यानंतर ते पुणे येथे स्थायिक झाले. निवृत्तीनंतरच्या कार्यकाळात ते जलक्षेत्रात प्रकल्प सल्लागार म्हणून काही कामे पूर्ण केली शासकीय सेवेमधून जरी ते निवृत्त झाले होते तरी आपल्या ज्ञान शाखेची नाळ आजीव तुटू दिली नाही. दिनांक २१ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्वभावाचे काही पैलू तसेच जलविज्ञान व जल नियोजन या शाखांतील त्यांचे योगदान शब्दरूपात केले आहे.

१. कै. मांडे यांना विविध विषयांवरील पुस्तके जमविण्याचा छंद होता तो त्यांनी आजीवन जोपासला. केवळ जल विषयक पुस्तकांपुरताच तो मर्यादित नव्हता. साहित्य, कला, समाजकारण, राजकारण, शिक्षण, अध्यात्म अशा विविध विषयांवरील चांगली पुस्तके व ग्रंथ त्यांच्या संग्रही होते. केवळ मराठीच नव्हे तर इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील प्रसिध्द पुस्तके व ग्रंथ त्यांनी बाळगले होते. त्यांच्या घरातील बहुतांशी वेळ वाचन व मनन यामध्ये जात असे. लेखक भारतीय आहे की परकीय आहे असा भेदभाव ते करीत नसत. तसेच ही ग्रंथसंपदा व्यवस्थितरित्या जतन केलेली असे. एखादा संदर्भ त्यांना हवा असल्यास व कोणी विचारणा केल्यास त्यांना तो लगेच काढून देत असत.

अनेक विषयांवरील दुर्मिळ पुस्तके त्यांच्याकडे होती. प्राचीन व अर्वाचीन – अभिजात वाङमय त्यांच्याकडे उपलब्ध होते. याखेरीज विविध राज्यांतील पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांचा मराठी भाषेत केलेला अनुवाद त्यांनी नजरेखालून घातलेले होते. शासनाने स्थापन केलेल्या समित्या, आयोग, अभ्यासगट यांचे अहवाल त्यांनी अपरिमित कष्ट घेवून उपलब्ध करून घेतलेले होते. पुस्तकांसाठी सढळ हाताने मदत करत. एखादे गाजलेले नवीन मिळविण्यासाठी ते प्रयत्नशील असत.

उत्तमोत्तम पुस्तकांचा छंद जोपासणे हे सुसंस्कृतपणाचे द्योतक आहे असे एका लेखकाने म्हंटले आहे. मांडे यांचा हा छंद त्याचीच साक्ष नव्हे काय ? एखाद्याची वैयक्तिक ग्रंथसंपदा एवढी मोठी असावी याचे कौतुक वाटते. वाचन संस्कृतीचा पुरस्कार करणे हे त्यांचे अंगीकृत कार्य बनून राहिले होते. ग्रंथ हेच गुरूह्या उक्तीचे कै. मांडे एक मूर्तीमंत रूपच होते.

२. कै. मांडे यांचा मित्रपरिवार मोठा होता. सर्व क्षेत्रातील माणसे त्यांचे मित्र होते. ते परस्परांशी संपर्कात रहात. समोरची व्यक्ती दुखावली न जाणे याची ते काळजी घेत असत. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेली माणसे थोड्या कालावधीतच त्यांचे मित्र बनून जात. त्यांची मुद्रा सदैव प्रसन्न असे त्यांच्या सहवासात कधीही कंटाळा येत नसे. अजात शत्रू या संज्ञेला ते पात्र होते.

विशेषत: जलक्षेत्रातील त्यांच्या विविध शाखांमध्ये असलेल्या स्वारस्यामुळे त्या त्या शाखांमध्ये देशातील अन्य राज्यात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणत्या घडामोडी चालू आहेत, कोणते परिवर्तन होत आहे, कोणती विचारधारा चर्चेत आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांनी अनेक परिसंवाद, समारंभ, सत्र यामध्ये समक्ष उपस्थित राहून राज्याची प्रतिमा उंचावण्यात ते प्रयत्नशील होते. यासाठी बहुतेक वेळा ते स्वखर्चाने जात असत. जलक्षेत्रात वेगाने होणाऱ्या परिवर्तनामुळे आवश्यक झालेल्या विचारधारांचा अवलंब अन्यत्र कसा केला जातो व भारताच्या वा महाराष्ट्राच्या स्तरावर त्यांचा कसा उपयोग करून घेता येईल हा त्यांच्या चिंतनाचा विषय झालेला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेली जलक्षेत्रातील दिग्गज व्यक्तींची व्याख्याने ऐकणे व अभ्यासणे हा त्यांचा एकमेव विरंगुळा होता.

३. कै. मांडे यांच्या स्वभावाचा एक पैलू म्हणजे ते खूप बोलके होते. प्रत्यक्ष चर्चेमध्ये तसेच दूरध्वनीवर बोलतांना समोरच्या व्यक्तीला ते प्रथम बोलू न देता आपणच संभाषण सुरू करीत. त्यामध्ये अलीकडे झालेल्या घडामोडी, संपर्कात आलेल्या व्यक्ती, त्यांच्यावर असलेल्या प्रासंगिक जबाबदाऱ्या, त्यांच्या कार्यवाहीची स्थिती, आगामी नियोजन या सर्वांचा आढावा घेणे व अगदी शेवटी दूरध्वनीवरील व्यक्तीला संपर्काचे प्रयोजन विचारणे ही त्यांची खासियत होती. प्रामाणिकपणा, निक्षर्वी स्वभाव, ज्ञान शाखेबाबत पूर्ण जाण, निष्ठेने केलेले काम या सर्वांच्या संमित्रणामुळे त्यांचा हा आढावा आपल्याला बोधप्रद होत तर असेच त्याचबरोबर तो आपल्याला अद्ययावत माहिती देखील पुरवित असे. सर्वसाधारणपणे २०–३० मिनीट आणि कमाची तातडी तसेच विषयाच्या महत्वानुसार कधी – कधी ५०–६० मिनीटेही ते बोलत असत. तरी पण दूरध्वनीवरील त्यांच्या संभाषणाचा कधी कंटाळा येत नसे. दूरध्वनीवर दीर्घकाळ संभाषण करणे हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होवून राहिला होता.

दैवगती किती विचित्र असते ते पहा त्यांच्या अखेरच्या आजारात डॉक्टरांनी त्यांना बोलण्यास मज्जाव केला होता. त्यांना बोलू न देणे त्यांच्या स्वास्थ्यासाठी नितांत आवश्यक होते. नियती किती बलवत्तर असते हे दिसते.

४. कै. मांडे यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होवून राहिलेल्या व बहुदा त्यांना अलीकडे जडलेला छंद म्हणजे पुस्तकाच्या प्रकाशन क्षेत्रात

त्यांना स्वारस्य. तज्ज्ञ लेखकांनी लिहिलेल्या वाङमयीन साहित्यकृती प्रकाशित करण्यामध्ये लेखकाला ते निस्पृहतेने मदत करीत असत. हे त्यांनी एक व्रत म्हणून अंगीकारले होते की काय असा संभ्रम निर्माण होतो पण ते हे व्रत त्यांनी आयुष्याचा शेवटपर्यंत निभावले. एखाद्या पुस्तक प्रकाशनाचा प्रस्ताव आल्यास रोखठोकपणे तो स्वीकारणे आणि तो पूर्ण करण्यासाठी हृदय ओतून काम करणे असा त्यांचा जीवनक्रम झाला. प्रकाशन किती दर्जेदार होईल, कोणी आश्रयदाता मिळेल का, पुस्तकाचे मूल्य निर्धारित करणे आणि वितरणाबाबत संबंधीतांकडे चाचपणी करणे. त्याच्या विमोचनासाठी समारंभाचे आयोजन, पुरेशी प्रसिध्दी, समारंभानंतर पुस्तकांच्या वितरणाची व्यवस्था आणि त्यानंतर पुस्तकाचे परिशीलन करून अभिप्राय देण्याबाबत मित्रांना व वाचकांना उद्युत करणे व पाठपुरावा करणे अशी कामे ते स्वेच्छेने करीत. पुस्तकांबद्दल नितांत आदर असल्याखेरीज असे निरपेक्ष व्यवहार करणे शक्य नाही. त्याचबरोबर वाचन संस्कृतीला पडत्या काळामध्ये त्यांच्या या कृतीने, जीवनदान मिळावे हा उात्त विचार त्यांच्या मनात असे.

अलीकडे त्यांनी प्रसिध्द झालेल्या पुस्तकांचे समारंभात मनोभावे सक्रीय योगदान दिले. डॉ. मोरवंचीकर, ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ, तसेच जल व संस्कृती ह्या विचारधारेचे पुरस्कर्ते यांचे देवगिरी किल्ल्यातील जलव्यवस्थापन, भारतीय जलसंस्कृती, बुऱ्हाणपूर येथील मध्ययुगीन जलव्यवस्थापन या पुस्तकांच्या प्रकाशनात त्यांचा सहभाग होता. जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव श्री. विद्यानंद रानडे ह्यांच्या पाण्या तुझा रंग कसा ? या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी घडवून आणले. सर विश्वैशवरय्या ह्यांच्यावर कै. मुकुंद धाराशिवकर ह्यांनी लिहिलेल्या पुस्काचे प्रकाशनही त्यांनी मार्गी लावले होते. अशी बुसंख्य उदाहरणे आहेत.

५. कै. मांडे हे जल विषयक शाखांचे आजन्म विद्यार्थी राहिले. त्यामुळे वेगवेगळ्या परिषदा, परिसंवाद, व्याख्याने ह्यामध्ये ते आवर्जून भाग घेत असत. संघटन कौशल्य त्यांच्याकडे होतेच पण ते वैयक्तिक स्वरूपात जलक्षेत्रातील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक स्वयंयेवी संघटनांशी संपर्कात असत. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन ह्या जलक्षेत्रातील स्वयंसेवी संघटनेचे ते पूर्ण केंद्राचे २५ वर्षे सचिव होते. तसेच त्या संस्थेच्या मुंबई येथील मुख्यालयाचे ४ वर्ष मानद सचिव होते. भारतीय जल व संस्कृती मंडळ तसेच सिंचन सहयोग, पुणे याचे ते आजीव सदस्य होते. ग्लोबल वॉटर पार्टनरशिप, वर्ल्ड वॉटर वीक, सिंगापूर इंटरनॅशनल वॉटर वीक, अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन, इंडिया वॉटर वीस या संघटनांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. दरवर्षी होणाऱ्या जागतिक जल दिनाच्या भारतात आयोजित केलेल्या समारंभास ते आवर्जून उपस्थित राहत.

६. ब्रिटीशांनी पुणे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी १९७० च्या दशकात खडकवासला धरण बांधले. त्यावेळी पुण्याची लोकसंख्या १ लाख होती. अलीकडे पुण्याची लोकसंख्या ४५ लाख झाली. वाढती लोकसंख्या व शहरीकरण यामुळे पाणी पुरवठा कमी पडत होता. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ७–८ धरणांमध्ये खडकवासला हे एक आहे. धरणाच्या जलाशयात आतापर्यंत सुमारे ४० टक्के गाळ जमा झालेला होता. सोशन कार्पोरेट रिस्पॉन्सिबिलीटी खाली करण्याचे ठरले. २०१२ मध्ये पुमे येथील ग्रीन थंब संस्थेने निवृत्त ले. कर्नल सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि परिसरातील पाणी क्षेत्रात सक्रीय असलेल्या स्वयंसेवी संघटनांनी एकत्रीत येवून खडकवासला जीर्णोध्दार प्रकल्प जलसंपदा विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविला. या यशस्वी उपक्रमाची नोंद अंतरराष्ट्रीय स्तरावर देखील झाली. अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन व स्टॉकहोम, स्वीडन यांच्याकडून आलेल्या सुचनेनुसार सर्व जक्षामध्ये या यशोगाथेचा रोल मॉडेल म्हणून प्रयोग करण्याबद्दल उद्युक्त करावे असा प्रस्ताव आला. त्याची पूर्तता करण्यामध्ये कै. मांडे यांचा सक्रीय सहभाग होता.

७. ब्रिटीश काळआमध्ये तयार बनविलेल्या देशातील जिल्हा दर्शनिका ह्या काळाच्या ओघात कालबाह्य झाल्या होत्या. २० व्या शतकाच्या मध्यापासून सर्वत्र मोठ्या प्रमाणावर बदल झाले होते. शिवाय वाढती लोकसंख्या व वाढते शहरीकरण यामुळे विकासाचे परिमाण अणूलाग्र बदलले. ग्लोबल वॉटर पार्टनरशिप यांच्या उत्तेजनामुळे महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांची दर्शनिका अद्ययावत करण्याचा निर्णय घेण्यात आला. जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव श्री. विद्यानंद रानडे साहेब यांनी महाराष्ट्रातील प्रवरा खोऱ्याची दर्शनिका अशा रितीने तयार केली. यामध्ये डॉ. रा.श्री. मोरवंचीकर, डॉ. अरूणचंद्र पाठक यांच्याबरोबरच कै. शरद मांडे यांचेही मोलाचे योगदान होते.

८. या ४० –५० वर्षाच्या कालखंडात सर्व क्षेत्रात झालेल्या अणूलाग्र बदलामुळे विकासाबरोबरच पर्यावरणाची होत असलेली हानी याबद्दल जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर विचारमंथन झाले. पाण्याच्या उपलब्धतेमध्ये जेथे तूट आहे किंवा उपलब्ध पाण्याचे स्रोत दूषित झालेले आहेत किंवा पाणी स्थळ व काळाच्या सापेक्षतेमुळे दुष्काळ पडतो भरपूर पाऊस असूनही उन्हाळ्यामध्ये पाण्याची वणवा भासते आणि हवामान बदलाच्या प्रक्रियेमुळे जल वैज्ञानिक चक्र असंतुलित होते. पाण्याच्या वितरणातील व उपलब्धतेतील विषमतेमुळे प्रदेशा–प्रदेशात अनुशेषाच्या समस्या उद्भवल्या आहेत. कधी पूर तर कधी अवर्षण यामुळे पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवता येत नाही. विकासात एकात्मिता न साधल्यामुळे जल क्षेत्रात अनंत समस्या निर्माण झाल्या आहे.

या सर्वांचे मूळ कारण पर्यावरणाच्या संरक्षणातील मानवाकडून झालेला कसुर आणि सर्वत्र वाढलेला चंगळवाद यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास चालू झाला. बहुश्रुत चिंतनामुळे कै. मांडे यांना त्यांच्या स्वाभाविक संवेदनशीलतेमुळे पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व नैसर्गिक परिसंस्थेच्या जतनासाठी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे त्यांचे मत बसले. त्यानंतर त्यांच्या विचारांचा कल हा पर्यावरणाकडे झुकता झाला. अलीकडे पर्यावरणातील झालेल्या ऱ्हासामुळे ते सचिंत होत होते.

कै.मांडे यांच्या आत्म्यास शांती मिळो आणि आघात झालेल्या कुटुंबावर ते सहन करण्याचे सामर्थ्य परमेश्वराकडून मिळो अशी प्रार्थना करून ही श्रध्दांजली पूर्ण करतो.




जुन्नर शाळेचा परिसर

शाळेत झालेली शोकसभा















## श्री. शरद मांडे स्मृती विशेषांक

# कुटूंबियांसोबत परदेशात घेतलेली छायाचित्रे















